❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २२७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

संध्या प्रहार




# दिव्यांगांना प्राधान्य देण्यासाठी शासन कटिबद्ध

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दिव्यांगांना साहित्याचे निःशुल्क वाटप; दिव्यांगांना स्वावलंबी होण्यास मदत होणार

■ नागपूर (दै. संध्या)

दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी आणि सक्षम करण्यासाठी आवश्यक सहाय्यक साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच रोजगार, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात त्यांना प्राधान्य देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. दिव्यांगांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात येत आहे. सहाय्यक साधने उपलब्ध झाल्यामुळे दिव्यांग व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊन स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी भविष्यातही अशा शिबिरांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि नागपूर महानगरपालिका, भगवान महावीर विकलांग सहायता समिती जयपूर, जिल्हा परिषद नागपूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर जिल्ह्यातील अस्थिव्यंग व कर्णबधिर दिव्यांग व्यक्तींसाठी निःशुल्क जयपूर फूट साहित्य व सहाय्यक साधने मोजमाप व वाटप शिबिर कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, आमदार संजय भेंडे, आ. राजीव पोतदार, आ. कृपाल तुमाने, आमदार चरणसिंग ठाकूर, आ. मोहन मते, मनपा सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी महापौर दयाशंकर तिवारी, सहसचिव (मुख्यमंत्री कार्यालय) आशा पठाण आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, दिव्यांग व्यक्तींच्या गरजेनुसार जयपूर फूट साहित्य तसेच विविध सहाय्यभूत साधनांचे मोजमाप करून त्यांचे निःशुल्क वितरण करण्यात आले. आवश्यक साधने मिळाल्यामुळे दिव्यांग व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊन त्यांना अधिक स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या या शिबिराला अपेक्षेपेक्षा मोठा प्रतिसाद मिळाला असल्याचे समाधान त्यांनी यावेळी व्यक्त केले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, मुख्यमंत्री कार्यालयातून दिव्यांगांसाठी अशा प्रकारचे शिबिर आयोजित करण्याची संकल्पना पुढे आली. त्यानंतर नागपूर महानगरपालिका स्तरावर आवश्यक तयारी करण्यात आली. भगवान महावीर विकलांग सहायता समितीने या आयोजनासाठी विशेष योगदान दिले आहे. ही समिती 1975 पासून दिव्यांगांसाठी कार्यरत असून 'जयपूर फूट'च्या माध्यमातून दिव्यांगांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडविण्याचे काम करीत असल्याचे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारकडून दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. राज्य शासनाकडूनही दिव्यांगांना आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दिव्यांगांसाठी मानधन 2500 रुपये करण्यात आले असून विविध योजनांच्या माध्यमातूनही त्यांना मदत केली जात आहे. घरकुलासह अन्य शासकीय योजनांमध्ये दिव्यांगांना प्राधान्य कसे देता येईल, याबाबत शासन सकारात्मक प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. 'विकलांग'ऐवजी 'दिव्यांग' या सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांच्या क्षमतांना संधी देणे आवश्यक आहे. दिव्यांगता कमी करण्यासाठी तसेच दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दिव्यांग व्यक्तींच्या UDID कार्डसाठी झोननिहाय कामकाज करण्यात यावे, अशी सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी शासन भविष्यातही सातत्याने काम करीत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

तत्पूर्वी, महापौर नीता ठाकरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी आयोजनाच्या यशस्वी वाटचालीची माहिती दिली. शिबिराच्या यशस्वी आयोजनाची माहिती देणारी ध्वनिचित्रफीतही यावेळी दाखविण्यात आली. भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे पी. आर. मेहता यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तिरंगा वंदे मातरम प्रदर्शनाचे यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्रशांत उगेमुगे आणि डॉ. विजय कुमार शर्मा यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार मनपा सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर यांनी मानले.

## रायगडच्या विकासकामांना गती देत नागरिकांना केंद्रबिंदू मानून काम करा : मंत्री भरत गोगावले

■ मुंबई (दै. संध्या)

रायगड जिल्ह्यातील सर्व विभागांनी सामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून विकासकामे व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. नागरिकांना शासकीय योजनांचा व सुविधांचा वेळेत लाभ मिळेल, यासाठी विभागांनी समन्वयाने व गतिमान पद्धतीने काम करावे, असे निर्देश रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी दिले. रोहयो मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्ह्यातील विभागनिहाय सद्य:स्थिती (२०२६-२७) बाबत आढावा बैठक मंत्रालयातील त्यांच्या दालनात झाली. यावेळी जिल्ह्यातील विविध विभागांच्या कामांचा, प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला. बैठकीत रायगड जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालय व आरोग्य रुग्णालयातील सोयी-सुविधा, आरोग्य सेवा तसेच आवश्यक पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या संदर्भातील प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याबाबत आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याशी मंत्री गोगावले यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून प्रस्तावांवर तात्काळ कार्यवाही करण्याची विनंती केली. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ती मदत व कार्यवाही करावी, अशा सूचनाही मंत्री गोगावले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पात्र लाभार्थी शेतकरी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, यासाठी विभागांनी आवश्यक समन्वय साधावा, असे त्यांनी सांगितले. जिल्ह्याच्या विकासकामांसाठी प्राप्त झालेल्या निधीचा वेळेत व प्रभावीपणे वापर करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. मंजूर निधीचा योग्य विनियोग करून विकासकामांना गती देण्याच्या सूचना मंत्री गोगावले यांनी दिल्या.



यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## फळपीक विमा नुकसानभरपाईसाठी तातडीने कार्यवाही करा

### मंत्री नितेश राणे : तांत्रिक अडचणी दूर करून पात्र शेतकऱ्यांना न्याय देण्याचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत तांत्रिक त्रुटींमुळे नुकसानभरपाईपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळवून द्यावा. शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणत्याही तांत्रिक अडचणी आड येणार नाहीत आणि पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची नुकसानभरपाई मिळेल, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने व गतीने काम करावे, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री तसेच सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी आज यंत्रणांना दिले.



मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील फळपीक विमा नुकसानभरपाईच्या प्रश्नासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस महाराष्ट्राचे कृषी आयुक्त सुरज मांढरे, सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, सिंधुदुर्ग जिल्हा कृषी अधिकारी, सीएससीचे व्यवस्थापक वैभव देशपांडे, भारतीय कृषी विमा कंपनीचे व्यवस्थापक अनिल कुंभारे, सिंधुदुर्ग जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी, सिंधुदुर्ग माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सतीश सावंत, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत सन 2025-26 मधील पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी मंत्री नितेश राणे म्हणाले, हवामानातील बदल व तापमानवाढीमुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा आणि काजू पिकांचे नुकसान झाले आहे. मात्र, काही प्रकरणांमध्ये तांत्रिक नोंदी व कागदपत्रांतील त्रुटींमुळे काही शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाईचा लाभ मिळू शकलेला नाही. या सर्व त्रुटी तातडीने दूर करून पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने करावी. काही विमा प्रस्ताव कागदपत्रांतील त्रुटींमुळे रद्द झाल्याचे निदर्शनास आले असून, त्या प्रकरणांची पूर्तता करून प्रस्ताव पुन्हा कार्यान्वित करावे. हवामान केंद्रांशी संबंधित तांत्रिक बाबी, महसूल मंडळांच्या नोंदी आणि विमा दाव्यांतील अडचणी सोडविण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देशही मंत्री नितेश राणे यांनी दिले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा व काजू पिकांच्या नुकसानीबाबत काही महसूल मंडळांना तांत्रिक नोंदीअभावी लाभ न मिळाल्याच्या तक्रारींबाबतही योग्य ती कार्यवाही प्राधान्याने करावी. तसेच आजगाव महसूल मंडळातील स्वयंचलित हवामान केंद्रातील तांत्रिक त्रुटींमुळे अत्यल्प भरपाई मिळाल्याच्या प्रकरणाबाबतही उपाययोजना करण्याचे निर्देश मंत्री नितेश राणे यांनी दिले. यावेळी मंत्री नितेश राणे म्हणाले, संकट काळात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे आणि अशा तांत्रिक अडचणी दूर करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. नुकसानामुळे शेतकरी संकटात सापडला असून. अशा बिकट प्रसंगी शासन या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यास बांधील आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याची प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री नितेश राणे यांनी दिले.

## निसर्गपुत्रांच्या अंगणात विकासाची नवी पहाट

### पालकमंत्री संजय राठोड यांनी कोलाम पोडावर साजरा केला जागतिक आदिवासी दिन : नृत्य करत भोजनाचाही घेतला आस्वाद

■ यवतमाळ (दै. संध्या)

जल, जंगल आणि जमिनीशी एकरूप झालेली संस्कृती, निसर्गालाच दैवत मानणारा निगर्वी भाव आणि खडतर जगण्यातही जपलेली स्वाभिमानाची परंपरा, अशा आदिम संस्कृतीचा गौरव करण्याचा दिवस म्हणजे जागतिक आदिवासी दिन. या औचित्यावर केवळ औपचारिकता न पाळता, यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी आज, रविवारी बाभूळगाव तालुक्यातील पिंपरी ईजारा येथील इंदिरानगर कोलाम पोडावर जाऊन संपूर्ण दिवस आदिवासी बांधवांसोबत व्यतीत केला. शासकीय प्रोटोकॉल बाजूला ठेवून जमिनीवर बसून केलेला हा संवाद वंचित घटकाला आत्मसन्मानाची जाणीव करून देणारा आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणारा संवेदनशील उपक्रम ठरला.



गावात पोहोचताच मोरपिसांचा पारंपरिक टोप परिधान करून पालकमंत्र्यांनी आदिवासी बांधवांसोबत ढोलाच्या तालावर फेर धरला. यावेळी सत्ता आणि जनतेमधील अंतर दूर झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पोडावरील चावडीवर आदिवासी दैवतांचे दर्शन घेत त्यांनी भगवान बिरसा मुंडा, क्रांतिवीर शामादादा कोलाम, राणी दुर्गावती आणि वीर बापुराव शेडमाके यांसारख्या महामानवांच्या प्रतिमांना अभिवादन केले. आपली बोलीभाषा, जल-जंगलावर आधारित जीवनशैली आणि निसर्गपूजक परंपरा ही मानवी संस्कृतीची खरी मुळे आहेत. तरुणांनी आपल्या कोलामी भाषेचा अभिमान बाळगत आधुनिक जगाशी स्पर्धा करण्यासाठी मराठी व इंग्रजी भाषेचे प्रभुत्वही मिळवावे, असे भावनिक आवाहन त्यांनी यावेळी केले. पालकमंत्र्यांनी चावडीवर गावकऱ्यांसोबत खाली बसून त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. कोलाम समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गावातील प्रलंबित प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता, उपस्थित अधिकाऱ्यांना तत्काळ अंमलबजावणीचे निर्देश दिले. गावात सुसज्ज अभ्यासिका, वाचनालय आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी थेट बससेवा सुरू करणे, उच्च शिक्षण व परदेशातील शिक्षणासाठी विशेष शिष्यवृत्ती, स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी जलशुद्धीकरण यंत्रे, सामाजिक सभागृह, सांस्कृतिक भवन आणि स्मशानभूमी उभारणीचे प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. महिला बचत गट आणि ग्रामसंघांना आर्थिक मदत देऊन स्थानिक पातळीवर उद्योग-व्यवसायाला चालना देण्याची ग्वाही त्यांनी दिली. आदिवासी पोडावरील समस्यांच्या पाठपुराव्यासाठी विशेष स्वीय सहायकाची नियुक्ती करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमास तहसीलदार मीरा पागोरे यांच्यासह पराग पिंगळे, हरिहर लिंगनवार, राजुदास जाधव, गजानन डोमाळे, यशवंत पवार, संजय हातगावकर, प्रद्युम्न जवळकर, आकाश राठोड, संजय रंगे, सचिन महल्ले, नितीन पखाले, लोकेश इंगोले, दर्शना इंगोले आदींसह विविध पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला, युवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप गाडे यांनी केले, तर संचालन सुरेश चिंचोळकर यांनी केले.

कार्यक्रमासाठी पोडावर पोहोचल्यानंतर पालकमंत्री संजय राठोड यांचे प्रत्येक घरासमोर ओवाळून स्वागत करण्यात आले. यावेळी काही ज्येष्ठ महिलांनी पाय धुवून पालकमंत्री राठोड यांचे स्वागत केले.

तेव्हा त्यांनीही या महिलांचे पाय धुवून त्यांना मातृवंदन केले. या प्रसंगाने उपस्थित महिला भावूक झाल्या आणि त्यांच्या गालावर अश्रू ओघळले. कार्यक्रमस्थळी जात असताना गावातील कौशल महादेव अंजिकर या वृद्ध महिलेने आदिवासी पारंपरिक नृत्याचा फेर धरला. त्यांनी पालकमंत्री संजय राठोड यांनाही नृत्य करण्याची विनंती केली. त्यावेळी पालकमंत्रीही आदिवासी नृत्यावर थिरकले.

## दरेकरांना त्यांची जागा दाखवून देऊ!

■ सांगली (दै. संध्या)



मराठा समाजाच्या कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्रे रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या कथित भूमिकेवरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा संताप व्यक्त केला आहे. "पदाचा आणि मंत्रिपदाचा गैरवापर करून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मराठा समाजाच्या लेकरांवर अन्याय केला आहे. आता सरकारने आणि विशेषतः एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांनी आपली चूक तातडीने सुधारावी, अन्यथा मराठे त्यांना घरी बसवल्याशिवाय राहणार नाहीत," असा थेट इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. सांगलीत माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी राज्य सरकार, बावनकुळे आणि आमदार प्रवीण दरेकर यांच्यावर सडकून टीका केली. मराठा समाजाच्या जुन्या नोंदी रद्द करण्यासाठी दिलेल्या पत्राच्या मुद्द्यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले, "सध्या हे सरकार मराठा समाजाच्या नोंदी कशा रद्द करायच्या, यासाठी रोज नवीन डाव शोधत आहे. कुणबी नोंदी रद्द करताना काहीतरी वेगळीच कारणे दिली जात आहेत. कधी म्हणतात नोंदीवर 'कुढ कुच' (खाडाखोड) लिहिले आहे, तर कधी म्हणतात पेनाने लिहिले आहे. 50-100 वर्षांपूर्वी सातबारे प्रिंटेड नव्हते, ते तलाठी हातानेच आणि पेनानेच लिहायचे. मग आता अक्षर बदलले म्हणून नोंदी कशा रद्द होऊ शकतात? बावनकुळेंना इतके कळत नाही का?"

## थोडक्यात...

### पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई : दैनिक संध्या

जिल्ह्यातील उत्कृष्ट खेळाडू तसेच गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कामाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने उत्कृष्ट खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांना जिल्हा क्रीडा पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात येते. या पुरस्कारांतर्गत २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षांसाठी मुंबई शहर जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू (पुरुष, महिला व दिव्यांग) व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक असे एकूण चार पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कारासाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी निलिमा अडसूळ यांनी केले आहे. जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी मुंबई शहर जिल्ह्यातील मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारातील उत्कृष्ट खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांनी विहित नमुन्यातील अर्ज व अधिक माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथून प्राप्त करून घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. पुरस्कारांसाठीचे विहित नमुन्यातील अर्ज ३१ ऑगस्टपर्यंत आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे बंद लिफाफ्यात सादर करावेत. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर (दूरध्वनी क्रमांक- ८८८८८९१६३२) येथे संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले आहे.

### खासदार विलीनीकरणावर सुनावणी

मुंबई : दैनिक संध्या

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांचे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत झालेले विलीनीकरण बेकायदेशीर असल्याचा दावा करत ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. लोकसभा अध्यक्षांनी या विलीनीकरणाला दिलेल्या मंजुरीला आव्हान देत, ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी ही याचिका दाखल केली आहे. या महत्त्वपूर्ण याचिकेवर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाच्या वतीने लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयाला तातडीने स्थगिती देण्याची मागणी न्यायालयाकडे करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने यावर कोणताही अंतरिम दिलासा देण्यास सध्या नकार दिला आहे. तसेच, या प्रकरणाची दखल घेत न्यायालयाने सर्व संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.

### शरद पवार गटाचे ८ खासदार मोदींना भेटले

नवी दिल्ली : दैनिक संध्या

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह पक्षाच्या आठ खासदारांनी आज नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आहे. सकाळी साडेअकराच्या सुमारास पंतप्रधान कार्यालयात ही बैठक झाली. मतदारसंघांतील प्रलंबित विकासकामे, राज्यातील पाणीटंचाई, शेतकरी, विद्यार्थी आणि इतर लोकहिताच्या प्रश्नांवर यावेळी चर्चा झाल्याचे समजते. भेटीच्या राजकीय पार्श्वभूमीमुळे या बैठकीकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे. महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी संसदेत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आपापल्या मतदारसंघातील व राज्याशी संबंधित कळीचे मुद्दे लावून धरले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी भेटीबाबत स्पष्टीकरण दिले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) एनडीएमध्ये जाणार असल्याच्या चर्चांना त्यांनी फेटाळून लावत, या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे सांगितले.

# संपादकीय

## कोणते कार्ड घ्यावे हाती!

**विविध सेवांसाठी स्वतंत्र स्मार्ट कार्डांची सक्ती नागरिकांना त्रासदायक ठरत असून, एकाच सामाईक कार्डची सुलभ व्यवस्था आवश्यक आहे.**

मार्केटिंगवाल्यांच्या प्रलोभनांपायी तुम्ही कितीही क्रेडिट कार्डे घेतलीत, तरी प्रत्यक्ष वापराच्या वेळी त्यातल्या कितीशा सुविधांचा लाभ होतो, हा प्रश्नच असतो. आपल्या पाकिटात अशा कार्डांची जंत्री तरी किती बाळगावी, हाही मुद्दा असतो. वाहतूकसाधने आणि सरकारी सवलतींसाठी तर इतकी कार्डे काढावी लागतात, की सवलतींपेक्षा ती काढण्याच्या त्रासातच नागरिकांची दमछाक होते.

एसटीने सुरू केलेल्या स्मार्ट कार्डामुळे ठिकठिकाणचे प्रवासी सध्या असेच कातावले आहेत. वरिष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना बसभाड्यात सवलत, अतिज्येष्ठांना मोफत प्रवास अशा योजना एसटी देते. मात्र आता त्यासाठी राष्ट्रीय सामाईक मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) काढणे अनिवार्य झाले आहे. त्याचे टोकन घेण्याकरिताही तासन् तास लोक रांगेत ताटकळत उभे होते. आपला नंबर लागल्यानंतरही महिनाभराने लोकांना कार्ड मिळणार आहे. ज्येष्ठांनी वरिष्ठ नागरिकांसाठीची ओळखपत्रे यापूर्वी घेतली आहेतच. प्रत्येकाकडे एव्हाना आधार कार्ड आहेच. तरी मग अशा कार्डांची सक्ती कशासाठी हा प्रश्न आहे. सवलतींच्या प्रतिपूर्तीसाठी नेमकी किती रक्कम दिली जाते, ती किती लोकांपर्यंत पोहोचते, याची खातरजमा सरकारच्या अर्थ विभागाला हवी असेल, तर तो त्यांचा प्रश्न झाला. त्यासाठी लोकांना वेठीस धरण्याचे कारण नाही. खरेतर हा प्रश्न आपल्याकडे अनेक सेवांसाठी विचारला जाऊ शकतो. राज्यातील एसटी असो किंवा बेस्ट किंवा मेट्रो, अशी स्मार्टकार्ड सुरू करताना त्याला नॅशनल मोबिलिटी – किंवा राष्ट्रीय परिवहन असे बिरुद जोडले जाते. प्रत्यक्षात मात्र कित्येकदा ही कार्डे केवळ त्या सेवांपुरतीच चालतात. एमएमआरडीएकडून पहिली मेट्रो रेल्वे उभारली जात होती, तेव्हापासून सर्व वाहतूक सुविधांसाठी सामाईक कार्डाच्या घोषणा केल्या गेल्या. मात्र रेल्वे, मेट्रो यांच्यात महसूलविभागणीवरून वाद असल्याची कारणे दिली गेली.

तंत्रज्ञानातील धुरीणांच्या मते या अडचणीत काही तथ्य नाही. ऑयस्टरसारखे कार्ड लंडनमधील सर्व वाहतूकसुविधांमध्ये चालते. चीनसारख्या अवाढव्य देशात वीचॅट या ॲपद्वारे सर्व सेवा-सुविधांचा उपयोग, पैसेभरणा करता येतो. आज आपणही प्रगत तंत्रज्ञानावर स्वार झालो आहोत, हे पासपोर्ट सेवांमधील सुलभता आणि डीजी यात्रा या विमानतळांवरील ॲपची सुविधा यातून सिद्ध झाले आहे. पासपोर्ट सेवांमध्ये आज कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय मुलाखतीची वेळ, पैशाचा भरणा यापासून पासपोर्ट हातात पडेपर्यंत सर्व व्यवहार सुरळीत होतात.

२०२२ पासून अस्तित्वात आलेल्या 'डीजीयात्रा' या तांत्रिकसुविधेचा विस्तार आज देशातील अनेक विमानतळांवर झाला असून तुमच्या आधार ओळखपत्राच्या अपलोडिंगपासून ते फोटोनुसार चेहरा ओळखण्यापर्यंत सर्व सुविधा एकछत्री आल्या. स्टार्टअप चॅलेंज स्पर्धेतून हे ॲप जन्मले, हे लक्षणीयच. टाटा कर्करोग रुग्णालयाने रुग्णनोंदणी झाल्यापासून एका ओळखपत्रावर सर्व काउंटरवर रुग्णांचे तपासणीअहवाल, औषधे, डॉक्टरांची वेळनिश्चिती या सर्व सुविधा देण्यास सुरुवात केली, त्यासही आता किमान दहा वर्षे तरी लोटली. खरेतर एक आधार कार्डद्वारे किंवा फारतर सर्व सुविधांसाठी एकच कार्ड ठेवून त्याद्वारे लाभ द्यायला हवेत. त्या कार्डाद्वारे संबंधित सेवापुरवठादारांना रक्कम चुकती होणे, हे इतके कठीण जाऊ नये.

डेटाचोरी, अफरातफर यांची जोखीम तर आहेच, परंतु असे घोटाळेबहाद्दर तर आताही वेगवेगळ्या लिंक वापरून लोकांना गंडा घालत आहेत. तोतयागिरीचा मुद्दा असेल, तर लाडकी बहीणपासून शेतकरी कर्जमाफीपर्यंत हजारो-लाखोंच्या संख्येने अपात्रांनी घुसखोरी केलीच. तांत्रिक सुरक्षेची तटबंदी करताना आपण अंतिम ग्राहकाची गैरसोय कशी टाळता येईल, हा मुद्दा पूर्णतः नजरेआड करत आहोत. लोकांना सुविधा द्यायच्या आहेत की त्रास, यावरच खल करण्याची गरज आहे.

# गुरु वचन

## दु:खावर विजय मिळवा

सिद्धार्थ नावाचा राजकुमार होता. त्याला जीवनात काहीच कमी नव्हते. तो सुंदर, सुदृढ व सद्गृहस्थ होता. त्याला कुठलेही शारीरिक किंवा मानसिक कष्ट नव्हते. त्याच्यापुढे सुख–समृद्धी हात जोडून उभी होती. त्याची पत्नी यशोधरा ही सुंदर, सुदृढ व पतीव्रता होती. त्याचा मुलगा राहुल सुद्धा मनमोहक व सुदृढ होता. सर्व काही होऊनही सिद्धार्थ दु:खाच्या अनुभूतीने पिडीत राहत होता.

खरं म्हणजे जन्मानंतर माणूस कुठल्यातरी शारीरिक किंवा मानसिक दु:खाने पिडीत असतो. दु:खांना पाहून व अनुभवूनच सिद्धार्थ बुद्धात रूपांतरित झाले. अभावावाचे कारण आपण अभावासच दु:खाचे कारण मानतो. जगातील बहुतेक श्रीमंत लोक दु:खी व असमाधानी आहेत. एखादी वस्तु किंवा व्यक्तीचा अभावच त्यांना दु:खी करतो. काही लोकांकडे पैशांची कमी नाही पण ते शारीरिक दु:खाने पिडीत आहेत.

काही लोक काम, क्रोध, ईर्ष्या, द्वेष, मोह सारख्या मानसिक दु:खांनी ग्रस्त असतात. तसेच काही लोक अज्ञानामुळे दु:खी आहेत. जर काही लोकांना दु:ख नसेल तर त्यांच्यासाठी जन्म–मृत्यूचे दु:खच काय कमी आहे? विजय म्हणजे लक्ष्य.जगात सुखाचे काही क्षण असतात. याचे प्रमाण आपणास लोकांचे हसणे, बोलणे, गाणे, खेळण्यात व आनंद साजरा करण्यात मिळू शकते. काही लोक थट्टा–मस्करी करताना दिसतात पण हे सर्व सुख क्षणभंगुर व तात्पुरते आहे. हा सर्व खटाटोप दु:खातून वाट काढण्याचा उपक्रम आहे. जर दु:खास जीवनाचा एक भाग मानले तर आपण याचाच विचार करून आपण आपले बहुमूल्य जीवन नष्ट केले पाहिजे? नाही, आपले लक्ष्य दु:खांवर विजय मिळवणे आहे. हाच आमचा पुरुषार्थ आहे. जगास दु:खालय मानून तडफडत मरणे मानवाचा लज्जास्पद पराभव आहे. त्याने जगास परीक्षा–स्थळ मानत दु:ख–सागरास ओलांडण्याचा उपाय शोधला पाहिजे. यामुळे त्यास सुख व शांतता लाभेल. जिथे रोग आहेत, तिथे उपचार आहे, जिथे अडचणी आहेत, तिथे त्यातून निघण्याचा मार्ग उपलब्ध आहे. फक्त आपल्या हृदयात खरी जिज्ञासा असण्याची गरज आहे. तसेच आपल्या लक्ष्याप्रती निष्ठावान व साहसी बनावे. विचारवंत मानतात की, मानवाची विषय तृष्णाच सर्व दु:खांचे मूळ आहे. जर ते तृष्णाच्या मृग–मरीचिकात फसण्यात स्वत:ला वाचवू शकले तर निश्चितपणे त्यांना कुठलेच दु:ख असणार नाही.

आपणास समोर जे दिसते, मनात तेच मिळण्याची इच्छा असते. जे आपल्याकडे आहे, त्यापेक्षा जास्त मिळवण्याची इच्छा करणेच तृष्णा आहे, जी कधीच पुर्ण होत नाही. जे आपल्याकडे आहे, त्यात समाधान मानून जर जास्तीत जास्त मिळवण्याची अनावश्यक इच्छा सोडली तर सर्व दु:ख टाळले जाऊ शकतात.

जगातील सर्व वस्त नश्वर आहेत. जर व्यक्तीने ही गोष्ट मनात आत्मसात केली तर जगातील कुठलेच दु:ख त्यास विचलित करु शकत नाही. भगवान बुद्धांनुसार, दु:ख निवृत्तीतून निर्वाणीत आहे. स्वत:ला राग–द्वेषातून मुक्त करणेच निर्वाण आहे, ज्यास थोड्या प्रयत्नातून मनुष्य आपल्या जीवनातच मिळू शकते.

# उपदेशकथा

## बळीची अवस्था

राजा बळी महान व्याक्तिंमत्व असलेला पूज्य पुरुष होता. भगवान विष्णूने वामनरूप घेतले आणि बळीला पाताळात लोटले. त्याची मनास्थिती कशी आहे हे पाहण्यास विष्णू नारदाला म्हणाला, 'नारदा ! एकदा बळीला भेटून ये.' त्याप्रमाणे नारद बळीकडे गेले. बळीने त्यांचे स्वागत केले व येण्याचे कारण विचारले. नारद म्हणाले, 'तू राज्यभ्रष्ट झालास. तुझे सर्व गमावले. आता तू कसा राहातोस हे प्रत्यक्ष पहावे म्हणून मी आलो.' आपली अवस्था सांगताना बळी म्हणाला, 'नारदा ! मी खरोखर समाधानी आहे. कारण जीवनामध्ये कोणतीही वस्तू ास्थिर नाही. कोणतीही घटना निश्चित नाही. काळ सर्वांवर स्वामित्त्व गाजवतो. काळाचे अद्भूत रहस्य ओळखून मी कोणत्याही अवस्थेचे फार सुख–दु:ख करीत नाही. काळ देतो व तोच हरण करतो. भविष्याच्या पोटात काय असते कोणास ठाऊक ! म्हणून मी देह काळाच्या स्वाधीन करून मनाने स्वरूपचिंतन करतो. मला काळाचे बंधन नाही.'

कथा उपदेश : भक्ताला काळाचे बंधन नाही.

# पंचांग

| | |
|---|---|
| ११ ऑगस्ट २०२६ | कृष्ण पक्ष |
| मंगळवार | तिथि:चतुर्दशी |
| विक्रम संवत्– २०८२ | २५:५३:२९+ |
| आषाढ शके | नक्षत्र:पुनर्वसु १०:०९:१० |
| संवत्– १९४८ | योग:सिद्ध १८:५१:११ |
| संवत्सर –पराभवनाम | करण:विष्टि १५:२२:४६ |
| अयन– दक्षिणयन | करण:शकुनि |
| मास– आषाढ | २५:५३:२९+ |
| ऋतु– सौर वर्षा | सूर्य:कर्क |

# दै.'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | 9 | | | 6 | | 1 | 2 |
| | | | | 4 | | 6 | | 9 |
| 6 | | 8 | | | 9 | | | |
| 2 | | | 4 | | 5 | 8 | 9 | |
| 9 | | 3 | | | | 2 | | 5 |
| | 8 | 1 | 9 | | 7 | | | 4 |
| | | | 2 | | | 4 | | 7 |
| 3 | | 2 | | 7 | | | | |
| 7 | 5 | | 8 | | | 1 | 2 | |

## : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०३६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 1 | 3 | 8 | 7 | 2 | 5 | 9 | 4 |
| 4 | 5 | 2 | 3 | 6 | 9 | 7 | 1 | 8 |
| 9 | 8 | 7 | 4 | 5 | 1 | 2 | 6 | 3 |
| 7 | 4 | 1 | 9 | 2 | 5 | 3 | 8 | 6 |
| 2 | 3 | 5 | 6 | 4 | 8 | 1 | 7 | 9 |
| 8 | 6 | 9 | 7 | 1 | 3 | 4 | 5 | 2 |
| 3 | 2 | 8 | 5 | 9 | 7 | 6 | 4 | 1 |
| 5 | 9 | 4 | 1 | 3 | 6 | 8 | 2 | 7 |
| 1 | 7 | 6 | 2 | 8 | 4 | 9 | 3 | 5 |

# इतिहासात आजचा दिवस

## आंतरराष्ट्रीय

- ई.स.पू. ३११४ – माया दिनदर्शिकेनुसार या दिवशी सध्याचे युग सुरू झाले.
- १४९२ – अलेक्झांडर सहावा पोपपदी.
- १८९८ – स्पॅनिश–अमेरिकन युद्ध – अमेरिकन सैन्याने पोर्तोरिकोतील मायाग्वेझ हे शहर जिंकले.

## राष्ट्रीय

- १७६१ – हैद्राबादच्या निजामशाहीची स्थापना.
- १९०८ – बॉम्बचा वापर करणारे बंगालचे क्रांतिकारक खुदीराम बोस यांना वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी फाशी देण्यात आली.
- १९३६ – मादाम रुस्तूम भिकाजी कामा यांचे निधन. त्यांनी भारताचा राष्ट्रध्वज तयार करून तो पॅरिस मध्ये प्रदर्शित केला.
- १९३९ – शिस्तभंगाच्या आरोपावरून नेताजी सुभाषचंद्र बोस यांची कॉंग्रेसमधून एक वर्षांसाठी हकालपट्टी.

## जन्म

- १८५५ – जॉन हॉजेस, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १८७० – टॉम रिचर्डसन, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८७२ – शिदेहारा किजुरो, जपानी पंतप्रधान.
- १८९७ – एनिड ब्लायटन, ईंग्लिश लेखिका.
- १९१२ – थानोम कित्तिकाचोर्ण, थायलंडचा पंतप्रधान.
- १९१६ – गोपाळ गुरुनाथ बेवूर, भारताचे माजी लष्करप्रमुख.
- १९४३ – परवेझ मुशर्रफ, पाकिस्तानचा लश्करप्रमुख, हुकुमशहा, राष्ट्राध्यक्ष.

## निधन

- ई.स.पू. ४८० – लिओनिदास, स्पार्टाचा राजा.
- १२०४ – गुट्टोर्म, नॉर्वेचा राजा.
- १९३९ – जीन बुगाटी, इटालियन अभियंता.

# : SMS :

Network nahi aa raha.
Phone:"Bhai mai bhi insaan hu, kabhi kabhi signal nahi pakadta"

# हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२ | २३.१ |
| अहमदनगर | ३१.२ | २२.८ |
| अकोला | ३३.१ | २६.१ |
| अमरावती | २९.४ | २५.७ |
| बीड | ३६ | २६.३ |
| भंडारा | ३४.४ | २६.१ |
| बुलढाणा | ४४.८ | ३१.५ |
| चंद्रपूर | ३५.७ | २६.३ |
| चेन्नई | ४१.८ | २७.५ |
| नवी दिल्ली | ४४.३ | २७.६ |
| धुळे | ३५.९ | २५.३ |
| गोंदिया | ३१.६ | २५.८ |
| जळगाव | ३४ | २५.४ |
| कोल्हापूर | ३०.७ | २२.९ |
| लातूर | ३२.५ | २३.५ |
| मुंबई | ३६ | ३० |
| नागपूर | ३४.३ | २६.३ |
| नांदेड | ३४.७ | २५.५ |
| नंदूरबार | ३१.७ | २४.५ |
| नाशिक | ३०.८ | २३.४ |
| पुणे | २८.८ | २२.५ |
| पंढरपूर | ३४.५ | २३.८ |
| सातारा | ३०.९ | २२.८ |
| सांगली | ३२.९ | २३.५ |
| सोलापूर | ३४.४ | २४.२ |
| वर्धा | ३३.६ | २६ |

# आजचे राशिभविष्य

**मेष :** मने जिंकून ध्येयपूर्ती कराल. एकमताने निर्णय घ्याल. सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल.

**वृषभ :** चांगल्या व्यावसायिक संधी उपलब्ध होतील. नव्या उमेदीने कामाला लागाल. नोकरीत पदोन्नती होईल. संतांचा सहवास लाभेल.

**मिथुन :** गृहउद्योग अथवा जोडधंद्यातून फायदा होईल. सामाजिक, राजकीय प्रतिष्ठा उंचावेल. व्यवसाय उद्योगातील उधारी उसनवारी वसूल होईल.

**कर्क :** दैनंदिन कामात थोडी दगदग झाली तरी त्याचे फळ उत्तम मिळेल. मोठ्या व्यक्तींच्या मदतीने उद्योग, नोकरीत उत्कर्ष करणाऱ्या घटना घडतील.

**सिंह :** लांबच्या प्रवासाचे योग येतील. कामाची आखणी नियोजनबद्ध केल्यामुळे व्यावसायिक उत्कर्ष साधता येईल. प्रतिष्ठित व्यक्तींचे सहकार्य लाभेल.

**कन्या :** भागीदारी व्यवसायातून नवीन कार्यारंभ केले जातील. नोकरी व्यवसायात आपले तत्व सोडून कोणतेही काम करु नका.

**तुळ :** नवीन करार करताना योग्य व्यक्तीचा सल्ला घ्यावा. नवोदित कलाकारांना प्रसिद्धीच्या झोतात येण्याचे योग येतील.

**वृश्चिक :** जनसंपर्कातून लाभ होतील. संशोधनपर अभ्यासक्रमातून यशस्वी व्हाल. आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल.


**धनु :** व्यवसायात उद्योगातून चांगली प्राप्ती होईल. व्यवसाय उद्योगात अभिनवपूरक तंत्र वापरले तर चांगली भरभराट होईल. प्रिय व्यक्तींच्या भेटी होतील.

**मकर :** आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील. नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल. आरोग्याच्या जुन्या तक्रारी डोके वर काढतील.

**कुंभ :** विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. जोडीदाराची पदोन्नती होईल. जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा.

**मीन :** आपल्या विचारात बदल करण्याचा प्रयत्न करावा. घरातील व्यक्तींच्या मतांना दुजोरा दिलात तर आपला फायदा होईल. मौल्यवान वस्तूंची खरेदी कराल.

# 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३७



### आडवे शब्द

१. चांदी
४. ऋतूचक्रातील पहिला आणि शेवटचा
८. दह्याचे पेय
१०. कुबड, वक्रता
११. क्षमाशील
१३. एकमेकांसमोर
१५. मुस्कटदाबी
१६. अंमलदार
१९. मजबूत
२०. मोठा जमीनदार
२३. निर्झराचा आवाज
२६. पुष्कळ
२७. द्रव
२८. झटपट, लवकर
३०. वेळ घालविणे
३१. चकमक, लढाई
३२. बांबूची पाटी
३४. नम्रता
३६. मुदतीचा शब्द
३७. परंतु
३९. प्रजा
४२. शोध, माग
४४. जाडसर पीठ
४६. आयुष्य
४९. माफी
५०. एक कैफी पदार्थ
५३. वर्षातून कधीतरी
५६. ऐटबाज, भपकेबाज
५९. कामदेव
६१. वृक्ष
६२. लोक
६३. श्रीमंत
६५. वर्ष, संवत्सर
६६. दोनशे
६८. शूर, पराक्रमी पुरुष
७०. मृत्तिका
७१. भरभराट
७३. युद्धास उत्सुक असलेला
७५. पुरुष
७७. गाण्यातील शब्दाला शब्द
७९. मोठा नगारा
८०. थंड
८२. बासरी
८४. अवाजवी
८६. काहीच्या काही वाढवून!
८९. खोटे बोलणारा
९०. छान, झकास
९१. पुरणाची करंजी
९२. भावाची बायको

### उभे शब्द

१. रक्षण करणारा
२. शिल्लक
३. पाण्यावरील तेलाचा थर
५. रागीट
६. शिरच्छेद, कत्तल
७. रसाळ
८. चांदणी
९. तारांबळ
१०. मूल
१२. शिव्याशाप
१४. पिसारा फुलवणारा
१७. हरळीसारखा कापडाचा मऊ प्रकार
१८. रांग
१९. कान
२०. डाळीचे कालवण
२१. करार
२२. जीभ, जिव्हा
२३. प्रयत्न, खटपट
२४. जखमेवरील पापुद्रा
२५. डोक्यावर हळूच मारलेली चापटी
२६. ताटातूट
२९. हजार किलो
३१. मलई
३३. गोव्याची राजधानी
३५. धातूचा जाड धागा
३६. दिवस
३८. जंगली, वन्य
४०. कुबेराचा सेवक
४१. लोकनाट्य
४३. खुंटी, मेख
४५. बातमीदार
४७. वस्त्र, कापड
४८ तिबेटी धर्मगुरू
५१. संपूर्ण
५२. अगदी सारखे
५४. थोडक्यात सार
५५. गारवा देणारे
५७. टक, पाहणे, दृष्ट
५८. दानी, दानशूर
६०. एक श्वासरोग
६४. बरणीच्या तोंडाला बांधलेले कापड
६६. दुसरा
६७. पूजेचे ताट
६८. नम्रतेने झुकलेला
६९. युद्ध गाजविणारा
७२. कट्टर
७४. पायऱ्यांची विहीर
७६. धपाटा
७८. वाळू, वाळवंट
८१. शिवरायांची कुलस्वामिनी
८३. घाव, प्रहार
८४. शेवट, नाश
८५. पारंब्यांचा वृक्ष
८७. एकमेकांचे कान धरून खेळण्याचा खेळ– -- म्याव
८८. स्वाक्षरी

### जम्बो शब्दकोडे क्र. १०३६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.परावलंबन ६.मखर ९.सच १०.दरारा ११.दासबोध १३.डबाबाटलीवाला १६.तलम १८.संतत १९.शेखी २०.मग २१.नादार २३.गोळीबार २५.नातलग २८.साय २९.बारीक ३१.अंतर ३३.अदाकार ३५.कवाड ३७.सावज ३८.गजानन ४०.नद ४२.तवा ४३.आर ४४.तपास ४६.सालोसाल ४९.कणीदार ५१.ताडमाड ५२.भाक ५३.दामाजी ५५.नगर ५७.मकरंद ५९.बारव ६०.जग ६१.सुधाकर ६२.हरा ६४.थांबा ६५.रानटी ६७. मनगट ६९.कथन ७०.कानन ७१.राजस ७३.रफार ७५.जळका ७७.मालक ७९.फसणे ८१.रचनाकर ८२.तड ८३.काशी

उभे उत्तर : १.पदभ्रमण २.रास ३.वरात ४.बदाम ५.नस ६.मध ७.रडतराऊत ८.अंबा ९.सवाशेर १२.बोगदा १४.बात १५.टकळी १७.लगत २१.नागरी २२.रस २३.गोडी २४.बारदान २५.नायक २६.लबाड २७.दरबार ३०.कसाबसा ३१.अंजन ३२.रग ३३.अनवाणी ३४. मदत ३६.वाणी ३९.जातककथा ४१.दया ४३.आरमार ४५.सतार ४६.सामानसुमान ४७.लोड ४८.लवकर ५०.दादा बाबा करणे ५४.जीवदान ५५.नजरानजर ५६.गगन ५७.मकबरा ५८.दहन ६३.राग ६६.टीकाकार ६७.मसलत ६८.टरफल ७२.जमा ७४.फास ७६.धोका ७८.कड ८०.शिशी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## मुस्लिम समाजातील नागरिकांसाठी मोफत वधू वर परिचय मेळावा संपन्न

**पुणे : दैनिक संध्या**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक विभाग व अ‍ॅड. आयुब शेख विचार मंच. रहबर सोशल फाउंडेशन यांच्या वतीने कोंढवा येथे न्यू डॉन हायस्कूलच्या प्रांगणात मुस्लिम समाजातील उच्चशिक्षित, शिक्षित, अविवाहित, घटस्फोटीत, विधवा /विधुर नागरिकांसाठी मोफत वधु वर परिचय मेळावा घेण्यात आला होता. याचे उद्घाटन आमदार चेतन तुपे यांच्या हस्ते करण्यात आले. मेळाव्यामध्ये पुणे,पिंपरी, मुंबई, ठाणे, उस्मानाबाद, कोल्हापूर, भिवंडी, सोलापूर, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, लोणावळा, महाबळेश्वर, इथून मोठ्या संख्येने वधू-वर पालक उपस्थित होते. यावेळी आमदार चेतन तुपे म्हणाले लग्न समारंभ म्हटलं तर लाखोंचा खर्च होतो सर्वसामान्य नागरिकांना हा खर्च झेपत नाही समाजामध्ये अशा वधू वर मेळावा घेणे व कमीत कमी खर्चात लग्न होणे ही काळाची गरज आहे. यावेळी संयोजकांच्या वतीने वधू वर मेळाव्यामध्ये पालक आणि उमेदवारांना प्रत्यक्ष संवाद साधून नाव नोंदणी करून सुमारे साडेसहा हजार बायोडाटा जमा करण्यात आले. या मेळाव्यात एकाच वेळी आठ जणांचे विवाह जुळवण्यात आले आहे. विविध राज्यातून वीस हजार मुस्लिम बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश कार्याध्यक्ष अ‍ॅड. आयुब शेख यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष पुणे शहर टॉप फाउंडेशनचे फैसल रिश्तेवाला, मुस्लिम बँकेचे संचालक बबलू सय्यद, बाप्पुसाहेब कांबळे, रश्मी कांबळे, अजीम परफ्युम वाले, अब्दुल कय्युम, समीर सय्यद, यास्मिन शेख, रुकसाना इनामदार, आदींनी परिश्रम घेतले.

## विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ६५ टक्के अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण

**पुणे : दैनिक संध्या**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत ९६ टक्के अर्जांचे वितरण पूर्ण झाले असून ६५.५३ टक्के अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे, अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राजकीय पक्षांच्या साप्ताहिक बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी तहसीलदार शीतल मुळे यांच्यासह नॅशनल पीपल्स पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार), भारतीय जनता पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आदी राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, शहरप्रमुख, सचिव तसेच प्रतिनिधी उपस्थित होते. अनुपस्थित, स्थलांतरित, मयत व दुबार मतदारांच्या याद्या संकेतस्थळावर उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर म्हणाल्या, अनुपस्थित, स्थलांतरित, मयत तसेच दुबार मतदारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. राजकीय पक्षांनी या याद्यांचे अवलोकन करून त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच नमुना क्रमांक ६, ७ व ८ मधील अर्जांचे अवलोकन करून मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी त्याचा उपयोग करावा. मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. या प्रक्रियेत राजकीय पक्षांचे सहकार्य महत्त्वाचे असून प्राप्त होणारे दावे व हरकती विहित मुदतीत निकाली काढण्यासाठी प्राधान्याने नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. पदवीधर, शिक्षक मतदार नोंदणीसाठी सहकार्याचे आवाहन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पदवीधर व शिक्षक मतदार याद्या तयार करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. या प्रक्रियेत शिक्षक व पदवीधर मतदारांची जास्तीत जास्त नोंदणी होण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहनही श्रीमती कळसकर यांनी केले. बैठकीत विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेसंदर्भात अडचणी व सूचना मांडल्या. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी संबंधित अडचणींचे निरसन केले.



## इन्फंट्री बटालियनमध्ये भरतीसाठी कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर येथे मेळावा

**पुणे : दैनिक संध्या**

सशस्त्र दलातील भूतपूर्व सैनिक आणि राज्य वन विभागाच्या भूतपूर्व महिला कर्मचाऱ्यांची १३६ इन्फंट्री बटालियन इको महार मध्ये भरती मेळाव्याचे कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर येथे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात कोल्हापूर १०९ इन्फंट्री बटालियन (टीए) मराठा लाईट इन्फंट्री येथे १ ते ४ सप्टेंबर २०२६ रोजी तर दुसऱ्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर एआरओ ग्राउंड येथे ८ ते ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ५ वाजल्यापासून भरती प्रक्रिया सुरु होईल. या भरतीमध्ये जेसीओ-०४. सोल (जीडी) १६२ फक्त महाराष्ट्रातील उमेदवारांसाठी, ट्रेडसमन १५ - सोल क्लार्क (जीडी)-०७, हेअर ड्रेसर-०९, मेस कीपर-०१, स्टीवर्ड-०१, हाऊस कीपर-०१, शेफ कम्युनिटी-०२ (संपूर्ण भारतातील उमेदवारांसाठी) इत्यादी पदे भरण्यात येणार आहेत. भरतीसाठी उमेदवार सशस्त्र दलातील भूतपूर्व सैनिक (निवृत्तीवेतनधारक) आणि वने व हवामान बदल मंत्रालय (MoEF&CC) व राज्य वन विभागात किमान २० वर्षे सेवा केलेले भूतपूर्व महिला कर्मचारी असावेत. भूतपूर्व सैनिक व भूतपूर्व महिला कर्मचाऱ्यांसाठी किमान वयोमर्यादा नाही, मात्र त्यांची सेवानिवृत्ती, सेवामुक्तीच्या तारखेपासून भरतीच्या तारखेपर्यंत ५ वर्षांच्या आत नोंदणी होणे आवश्यक आहे. कोणत्याही दिवाणी, फ़ौजदारी प्रकरणात सहभाग नसावा, निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय तपासणी आवश्यक राहील. मूळ निवृत्तिवेतन आदेश (पीपीओ), मूळ डिस्चार्ज पुस्तक, मूळ अधिवास प्रमाणपत्र, भूतपूर्व सैनिक ओळखपत्र, मूळ आधार कार्ड व त्यांच्या स्वयंसाक्षांकित प्रती, अलीकडील रंगीत पासपोर्ट आकाराचे १० छायाचित्र, शैक्षणिक प्रमाणपत्रे आवश्यक आहेत. भूतपूर्व सैनिक जेसीओ ५५ वर्षे वयापर्यंत, तर भूतपूर्व सैनिक शिपाई फक्त ५० वर्षे वयापर्यंत सेवा करु शकतात. भरती मेळाव्या दरम्यान मोबाईल फोनला परवानगी असणार नाही. अधिक माहितीसाठी ९१६८१६८१३६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर एस. फिरासत यांनी केले आहे.

# ‘स्वराज्य टिकावे यासाठी वंदे मातरम...’

## खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी कथन केला राष्ट्र मंत्राचा महिमा




■ पुणे (दै. संध्या)

अनेकांच्या त्याग आणि बलिदानाने मिळालेले स्वराज्य टिकवण्यासाठी आणि सुराज्य घडवण्यासाठी युवा पिढीवर राष्ट्र प्रेमाचे संस्कार घडवणे आवश्यक असून त्यासाठीचे सामर्थ्य 'वंदे मातरम' या राष्ट्र मंत्रात आहे, अशा शब्दात खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी वंदे मातरम या गीताचा महिमा कथन केला. यावेळी त्यांनी सध्या संपूर्ण वंदे मातरम युवा पिढीपर्यंत पोहोचविण्याची आग्रही अपेक्षा व्यक्त केली.

नागरी सोशल फाउंडेशनच्या शिक्षण विभागाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'संपूर्ण वंदे मातरम गायन'स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात खासदार कुलकर्णी बोलत होत्या. या कार्यक्रमाला महापौर मंजुषा नागपुरे, वंदे मातरमचे अभ्यासक मिलिंद सबनीस, नागरिक सोशल फाऊंडेशनचे विश्वस्त अमेय सप्रे, स्पर्धेच्या समन्वयक डॉ. शीतल गोडबोले, स्मिता देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेला विद्यार्थी, पालक आणि शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, सहाशेहून अधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

वंदे मातरम या गीताचे स्मरण होत असताना कवी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांना दुर्गा मातेच्या रूपात लक्ष्मी, सरस्वती आणि साक्षात भारत मातेचेही दर्शन घडले. त्यांनी आपल्या गीतात भारत मातेचे केलेले वर्णन प्रेरणा देणारे, भारावून टाकणारे आहे. प्रत्येक शब्द मनाला आणि मेंदूला भिडणारा आहे. या गीताच्या गायन आणि श्रवणाने राष्ट्रासाठी कार्य करण्याची उत्कट प्रेरणा प्राप्त होते, असे कुलकर्णी यांनी नमूद केले.

घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी स्वतंत्र भारतात वंदे मातरम या गीतालाही राष्ट्रगीताचाच दर्जा प्राप्त असेल, असे नमूद करून ठेवले होते. मात्र, त्यानंतर दीर्घकाळ सत्ताधाऱ्यांकडून हा दर्जा डावलण्यात आला. या गीताबद्दल बुद्धिभ्रंश करण्यात आला. विशिष्ट समाज घटकाचा अनुनय करण्यासाठी वंदे मातरमला डावलण्यात आले. मात्र, विद्यमान सरकारने वंदे मातरम या गीताला सन्मान प्रदान करणारे विधेयक संमत केले आहे, असेही खासदार कुलकर्णी यांनी नमूद केले. भारताला मिळालेले स्वातंत्र्य सहजपणे मिळालेले नाही. हे स्वातंत्र्य बिना खड्ग, बिना ढाल, मिळाल्याचा अपप्रचार केला जातो. मात्र, त्यात तथ्य नाही. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी देहाची ढाल करून शरीरावर शस्त्र झेलून बलिदान दिले आहे. मोठ्या त्यागातून मिळालेले हे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी सक्षम युवा पिढी घडवण्याचे कार्य आपण सर्वांनी करणे आवश्यक आहे, असेही कुलकर्णी म्हणाल्या.




## सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसचा शुभारंभ

■ पुणे (दै. संध्या)


सॅमसंग इंडियाने इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकॉम सेक्टर स्किल्स कौन्सिलच्या सहकार्याने सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस २०२६ चा शुभारंभकेला आहे. या उपक्रमाद्वारे १० राज्यांतील २०,००० तरुणांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) मोफत प्रशिक्षण दिले जाईल. सॅमसंग साऊथ वेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पार्क यांनी सांगितले की, “भारताच्या जागतिक एआय नेतृत्वाला पाठिंबा देण्यास कंपनी कटिबद्ध आहे. २०२२ पासून या उपक्रमातून २६,५०० हून अधिक तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले. एआय हे आपल्या काळातील सर्वात मोठ्या संधींपैकी एक आहे आणि आपल्या युवा प्रतिभेच्या बळावर या परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी भारत अद्वितीय स्थानावर आहे.

एसआयसी च्या माध्यमातून आम्ही एआय क्षेत्रातील पुढील पिढीच्या प्रतिभेत गुंतवणूक करत आहोत, ज्यामुळे भारतातील तरुणांना ज्ञान, आत्मविश्वास आणि व्यावहारिक अनुभव मिळेल आणि ते भारताच्या नवोन्मेषाच्या प्रवासात योगदान देऊ शकतील. भारतातील आमच्या 30 वर्षांच्या प्रवासाचा उत्सव साजरा करताना, भविष्यातील दिशा ठरवणाऱ्या प्रतिभेला घडवून भारताला जागतिक एआय नेतृत्वाच्या दिशेने नेण्याच्या देशाच्या दृष्टीकोनाला पाठिंबा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत,”

## हिमालया बेबीकेअरचे नवे ‘मॅची मॅची पीएच’ कॅम्पेन

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील सर्वांत विश्वासार्ह आणि लाडका ब्रँड 'हिमालया बेबीकेअर'ने आपले नवीन 'मॅची मॅची पीएच' कॅम्पेन सुरू केले आहे. बाळाच्या नाजूक त्वचेचा नैसर्गिक पीएच समतोल राखणे का महत्त्वाचे आहे, हे या कॅम्पेनमधून सांगितले जात आहे. या कॅम्पेनअंतर्गत कंपनीने 'हिमालया बेबीकेअर पीएच ५.५ जेंटल रेंज' सादर केली असून, यामध्ये हिमालया जेंटल बेबी शॅम्पू, हिमालया जेंटल बेबी वॉश, जेंटल बेबी लोशन आणि जेंटल बेबी क्रीम या उत्पादनांचा समावेश आहे. ही उत्पादने बाळाच्या त्वचेच्या पीएचशी तंतोतंत जुळत असल्यामुळे त्वचेचे नैसर्गिक संरक्षण कवच मजबूत राहते, ओलावा टिकून राहतो आणि बाळाला डोक्यापासून पायापर्यंत संपूर्ण व सौम्य देखभाल मिळते. या कॅम्पेनसाठी तयार करण्यात आलेल्या डिजिटल फिल्ममध्ये पालकांच्या रोजच्या जगण्यातील एक गोड क्षण दाखवला आहे. फिल्ममध्ये एक आई आपल्या बाळाला आवडीने मॅचिंग कपडे घालते आहे आणि त्याच वेळी ती आणखी एका महत्त्वाच्या मॅचची म्हणजेच बाळाच्या त्वचेच्या पीएचची आठवण करून देते. आपल्या बाळाची प्रत्येक छोटी छोटी गोष्ट परफेक्ट मॅच असावी यावर पालकांचा भर असतो, पण बाळाची त्वचा सुरक्षित, मऊ आणि निरोगी ठेवण्यासाठी तिच्या नैसर्गिक पीएचशी मॅच होणारी उत्पादने वापरणेही तितकेच महत्त्वाचे आहे, याची आठवण हे कॅम्पेन करून देते. याची टॅगलाईन "मॅची मॅची पीएच" देखील सोपी आणि लक्षात राहणारी आहे. हिमालया बेबीकेअरची पीएच ५.५ जेंटल रेंज बाळाच्या त्वचेचा नैसर्गिक पीएच समतोल राखते, त्वचेचे संरक्षण कवच मजबूत करते आणि ओलावा टिकवून ठेवते, हे या फिल्ममध्ये दाखवले आहे.



■ बाळाच्या त्वचेचा नैसर्गिक पीएच समतोल राखण्याचे महत्त्व पटवून देणार

■ विविध भाषांमधील कॅम्पेन निरोगी आणि सुरक्षित त्वचेसाठी पीएच ५.५ च्या सौम्य देखभालीवर भर देणार

## रेडमी नोट १७ ५जीची दमदार एन्ट्री; तीन दिवसांचा बॅकअप

■ पुणे (दै. संध्या)

शाओमी इंडियाने आज ‘रेडमी नोट १७ ५जी’ स्मार्टफोन भारतात सादर केला. रेडमीच्या नोट मालिकेतील या नव्या स्मार्टफोनमध्ये कंपनीने आतापर्यंतची सर्वात मोठी ८,००० एमएएच सिलिकॉन-कार्बन बॅटरी, १२० हर्ट्झ ट्रूकलर अमोलेड डिस्प्ले, स्नॅपड्रॅगन ४ जेन ४ प्रोसेसर आणि दीर्घकालीन सॉफ्टवेअर अद्यतनांचा समावेश केला आहे. ८.४ मिमीच्या स्लिम डिझाइनमध्ये असलेल्या रेडमी नोट १७ मध्ये ८,००० एमएएच क्षमतेची बॅटरी देण्यात आली असून, सामान्य वापरामध्ये ती तीन दिवसांपर्यंतचा बॅटरी बॅकअप देत असल्याचा कंपनीचा दावा आहे. फोनमध्ये ४५ वॅट टर्बो चार्जिंग असून चार्जर बॉक्समध्येच देण्यात येणार आहे. याशिवाय २२.५ वॅट रिव्हर्स वायर्ड चार्जिंगची सुविधाही मिळते. TÜV प्रमाणपत्रानुसार १,६०० चार्जिंग सायकलनंतरही बॅटरी ८० टक्क्यांपर्यंत आरोग्य टिकवून ठेवते. मनोरंजनासाठी फोनमध्ये ६.९ इंचांचा ट्रूकलर अमोलेड डिस्प्ले देण्यात आला आहे. १२० हर्ट्झ अडॅप्टिव्ह सिंक रिफ्रेश रेट, १०० टक्के DCI-P3 कलर गॅमट आणि १,८०० निट्सपर्यंत पीक ब्राइटनेस ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. २०० टक्के आवाज क्षमतेचे स्पीकर्स, ओल्या हातांनीही चांगला टच प्रतिसाद देणारे हायड्रो-टच २.० आणि TÜV राइनलँड आय केअर प्रमाणपत्र यामुळे वापराचा अनुभव अधिक चांगला होतो. कामगिरीसाठी रेडमी नोट १७ मध्ये ४ नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारित स्नॅपड्रॅगन ४ जेन ४ मोबाइल प्लॅटफॉर्म देण्यात आला आहे. मेमरी एक्स्टेंशनसह १६ जीबीपर्यंत रॅम, २ टीबीपर्यंत वाढवता येणारी संचयन क्षमता आणि १०,४१६ चौरस मिलिमीटर ग्राफाइट कूलिंग प्रणाली यामुळे दैनंदिन वापरात सुरळीत कामगिरी मिळण्याचा दावा कंपनीने केला आहे. ‘लाँग-टर्म फ्लुएंसी इंजिन’च्या मदतीने तब्बल ४८ महिन्यांपर्यंत सुरळीत कामगिरी राखण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. फोटोग्राफीसाठी फोनमध्ये ५० मेगापिक्सेल एआय ड्युअल मागील कॅमेरा आणि ८ मेगापिक्सेल एआय फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. नाईट मोड, एआय एचडीआर, डायनॅमिक शॉट्स, एआय एडिटर आणि २ पट इन-सेन्सर झूम यांसारखी छायाचित्रणाची वैशिष्ट्ये यात आहेत. रेडमी नोट १७ हा हायपरओएस ३ सह अँड्रॉइड १६ वर चालतो. कंपनीकडून चार वर्षांचे अँड्रॉइड अद्यतन आणि सहा वर्षांचे सुरक्षा अद्यतन देण्यात येणार आहेत. फोनमध्ये कॉर्निंग गोरिल्ला ग्लास 7i तसेच धूळ आणि पाण्यापासून संरक्षणासाठी IP65 मानांकन देण्यात आले आहे. रेडमी नोट १७ डार्क नाईट, आर्क्टिक ब्लू आणि स्टारलाईट पर्पल या रंगांमध्ये उपलब्ध होईल. ६ जीबी रॅम आणि १२८ जीबी संचयन प्रकाराची एमआरपी २७,९९९ रुपये असून, प्रारंभिक किंमत २४,९९९ रुपये आहे. तर ८ जीबी रॅम आणि १२८ जीबी संचयन प्रकाराची एमआरपी ३०,९९९ रुपये असून, प्रारंभिक किंमत २७,९९९ रुपये आहे. प्रारंभिक किमतीमध्ये एसबीआय कार्ड, अ‍ॅक्सिस बँक आणि कोटक बँकेच्या क्रेडिट कार्ड किंवा ईएमआय व्यवहारांवर मिळणारी ३,००० रुपयांपर्यंतची तात्काळ बँक सवलत समाविष्ट आहे. ग्राहकांना जिओ ट्रू 5G सोबत ५ टीबी जिओएआय क्लाउड स्टोरेज, तीन महिन्यांचे यूट्यूब प्रीमियम लाइट आणि सहा महिन्यांचे गुगल वन २०० जीबी क्लाउड स्टोरेज मिळणार आहे. हा स्मार्टफोन १३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ वाजता mi.com, अ‍ॅमेझॉन स्पेशल्स आणि शाओमी रिटेलवर विक्रीसाठी उपलब्ध होईल.




## बार्टी अधिछात्रवृत्ती प्रश्न : ‘आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन’ची समाजकल्याण आयुक्तांसोबत सविस्तर चर्चा

**मागण्या मान्य न झाल्यास १९ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन**

■ पुणे (दै. संध्या)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) अंतर्गत पीएच. डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात नव्याने स्थापन झालेल्या 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन' च्या शिष्टमंडळाने आज समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

या बैठकीत शिष्टमंडळाने बार्टी अधिछात्रवृत्तीच्या (BANRF) जागांची संख्या केवळ १०० न ठेवता ती किमान ६०० करावी आणि ३५ वर्षांची जाचक वयोमर्यादेची अट पूर्णपणे रद्द करावी, या प्रमुख मागण्यांवर प्रशासनाचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांच्या भावना आणि मागण्यांची गांभीर्यपूर्वक दखल घेत आयुक्त दीपा मुधोळ मॅडम यांनी या विषयावर सविस्तर चर्चा करून पुढील निर्णय घेण्यासाठी बुधवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी निबंधक (बार्टी) यांच्या समवेत एका विशेष बैठकीचे आयोजन केले आहे.

समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ मॅडम यांच्यासोबत झालेल्या या महत्त्वपूर्ण चर्चेत 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन' च्या विद्यार्थी शिष्टमंडळाचे नेतृत्व आणि सहभाग राहुल डंबाळे, राहुल ससाने, अक्षय कांबळे, सिद्धार्थ ओव्हाळ, सुरेखा मेश्राम, प्रथमेश सूर्यवंशी आणि नितीन आंधळे यांनी केला. त्यांनी विद्यार्थ्यांची बाजू अत्यंत प्रखरपणे प्रशासनासमोर मांडली.

१२ ऑगस्ट रोजी होणाऱ्या बार्टी निबंधकांसोबतच्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर ठोस आणि सकारात्मक निर्णय न झाल्यास, सर्व संशोधक विद्यार्थ्यांनी एकत्र येत १९ ऑगस्ट २०२६ पासून पुणे येथील समाजकल्याण आयुक्त कार्यालयासमोर 'बेमुदत धरणे आंदोलन' करण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. शैक्षणिक संधींमधील भेदभाव आणि जाचक अटींविरोधात संपूर्ण महाराष्ट्रातील मागासवर्गीय विद्यार्थी या आंदोलनात मोठ्या संख्येने उतरणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.



## कारगिल विजय दिन सप्ताहानिमित्त सूर्यदत्त नॅशनल स्कूलमध्ये शौर्याला अभिवादन

■ पुणे (दै. संध्या)

"भारतीय सैन्याने आजवर सीमेवर कडा पहारा देत देशवासीयांचे रक्षण केले आहे. निःस्वार्थ देशसेवा हाच ध्यास घेऊन संरक्षण दल काम करत असते. विद्यार्थ्यांनीही यातून प्रेरणा घेत राष्ट्रप्रेम, शिस्त, धैर्य, कर्तव्यनिष्ठा व निःस्वार्थ देशसेवेचा अंगीकार करावा," असे प्रेरणादायी मार्गदर्शन माजी नौदल अधिकारी सुदीर चौहान यांनी विद्यार्थ्यांना केले. कारगिल विजय दिन सप्ताहानिमित्त सूर्यदत्त नॅशनल स्कुलमध्ये सैन्याच्या शौर्याला अभिवादन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या प्रेरणेतून, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा यांच्या नेतृत्वात बावधन येथील सूर्यदत्त नॅशनल स्कूल येथे कारगिल विजय दिन सप्ताहाचे आयोजन केले होते. भारतीय सैन्याच्या अद्वितीय पराक्रमाला मानवंदना अर्पण करत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, कर्तव्यनिष्ठा आणि सैनिकांविषयी आदरभाव जागृत करण्याच्या उद्देशाने हा विशेष उपक्रम घेण्यात आला.



भारतीय जवानांच्या शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संपूर्ण आठवडाभर विविध देशभक्तिपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या विशेष कार्यक्रमासाठी भारतीय नौदलातील माजी स्टोअर पेटी ऑफिसर (एसपीओ) सुदीर चौहान हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी तब्बल १५ वर्षे भारतीय नौदलात उल्लेखनीय सेवा बजावत देशसेवा केली आहे. चौहान यांनी आपल्या सैन्य सेवेतले अनुभव सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक, हेड बॉय आणि हेड गर्ल यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून त्यांना पर्यावरण संवर्धनाचे प्रतीक म्हणून रोप भेट देऊन केली. त्यानंतर कारगिल युद्धातील शहीद जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दोन मिनिटे मौन पाळून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. विद्यार्थ्यांनी कारगिल विजय दिनाचे महत्त्व, १९९९ च्या कारगिल युद्धातील भारतीय सैन्याचे अद्वितीय शौर्य आणि सर्वोच्च बलिदान याविषयी माहिती सादर केली. देशासाठी दिलेल्या त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल शाळेच्या वतीने चौहान यांचा सत्कार करण्यात आला. कारगिल विजय दिन सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना आणि सर्जनशीलता विकसित करण्यासाठी विविध आंतरगृह स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले. इयत्ता पहिली व दुसरीसाठी रंगभरण स्पर्धा, तिसरी ते पाचवी तसेच सहावी ते आठवीसाठी चित्रकला व निबंध स्पर्धा, तर नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला आणि पत्रलेखन स्पर्धा घेण्यात आल्या.

पत्रलेखन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी कारगिलच्या वीर जवानांप्रती कृतज्ञता, अभिमान आणि आदर व्यक्त करणारी हृदयस्पर्शी पत्रे लिहिली.या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यांच्या चित्रांमधून, निबंधांमधून आणि पत्रांमधून भारतीय सशस्त्र दलांविषयीचा आदर, राष्ट्रीय एकात्मता, धैर्य, कर्तव्यभावना आणि देशसेवेची प्रेरणा प्रभावीपणे व्यक्त झाली.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची जाणीव रुजविण्यावर सूर्यदत्तचा नेहमीच भर असल्याचे सांगितले. स्नेहल नवलखा यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या सैनिकांच्या त्यागाची जाणीव होत असून त्यांच्यात राष्ट्राविषयी अभिमान, जबाबदारी आणि कृतज्ञतेची भावना अधिक दृढ होत असल्याचे नमूद केले.

कारगिल विजय दिन सप्ताहानिमित्त आयोजित या विविध देशभक्तिपर उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, शौर्याचा सन्मान आणि देशसेवेची प्रेरणा अधिक बळकट झाली. देशाच्या वीर जवानांना अभिवादन करत सूर्यदत्त नॅशनल स्कूलने पुन्हा एकदा मूल्याधिष्ठित, जबाबदार आणि राष्ट्राभिमानी नागरिक घडविण्याच्या आपल्या वचनबद्धतेची प्रचिती दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कामचुकार अधिकारी-कंत्राटदारांवर नितीन गडकरींकडून कारवाईचा हातोडा

**नागपूर : दैनिक संध्या**

शहरातील खोदलेल्या खड्ड्यांबाबत जनतेत नाराजी असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यासंदर्भात कठोर भूमिका घेतली आहे. खोदलेले रस्ते न बुजविणाऱ्या कंत्राटदारांना ब्लॅक लिस्ट करण्यात यावे तसेच कामात हलगर्जी करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करा, असे आदेश त्यांनी रविवारी दिले. नागनदी प्रकल्प, अतिक्रमणानंतरचे पुनर्वसन आणि शहरातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीत गडकरी यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. या बैठकीला महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, आ. कृष्णा खोपडे, आ. मोहन मते, आ. संजय भेंडे, सत्तापक्षनेते बाल्या बोरकर, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, नासुप्र सभापती संजय मीणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी उपस्थित होते. अमृत योजनेतील कामे करताना शहरातील रस्ते खोदले गेले आणि अनेक ठिकाणी पूर्ववत न केल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. आता नागनदी प्रकल्पांतर्गत सांडपाणी प्रक्रिया तसेच मलवाहिन्यांचेही काम होणार आहे. एकूण पाच टप्प्यांमध्ये हे काम होणार असून यामध्ये ३ नव्या एसटीपींची उभारणी, दोन जुन्या एसटीपींची पुनर्बांधणी, तसेच पश्चिम, दक्षिण-पश्चिम, दक्षिण, मध्य व पूर्व अशा पाच मतदारसंघांमध्ये प्रकल्पाच्या विविध कामांसाठी रस्त्यांचे खोदकाम होणार आहे. मात्र, पूर्वानुभव लक्षात घेता रस्त्यांचे खोदकाम आणि रस्ते पूर्ववत करणे या दोन्ही गोष्टींसाठी अद्ययावत यंत्रांचा वापर करण्याच्या सूचना गडकरी यांनी दिल्या. नागनदीच्या काठापासून १५ मीटर अंतराच्या आत असलेल्या अनधिकृत वसाहती, झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण हटविण्यात येणार आहे. त्यांचे पुनर्वसन करताना सद्यस्थितीत २५०० घरांची आवश्यकता भासणार असल्याचे मनपा आयुक्तांनी सांगितले. यासंदर्भात मनपा, नासुप्रच्या रिकाम्या जागांचे सर्वेक्षण करून ५००० घरांची सोय करता येईल, या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्याची सूचना गडकरींनी केली.

### ७५ वर्षांतील विकासाची वाटचाल खटकली म्हणून उपवर्गीकरणाचा घाट

**नागपूर : दैनिक संध्या**

हजारो वर्षांपासून मागासवर्गीयांवर अन्याय झाला आहे. ते विकासापासून वंचित होते. आता थोडासा विकास होत आहे आणि तो केवळ संविधानामुळे शक्य झाला आहे. हजारो वर्षांच्या विकासाच्या अंतरापासून दूर असलेल्यांचा गेल्या ७५ वर्षांतील विकास काहींना खटकत आहे. त्यामुळे उपवर्गीकरण आणि इतर माध्यमातून या समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत आहे, अशी चर्चा राष्ट्रीय आरक्षण संवर्धन परिषदेत झाली. आरक्षण उपवर्गीकरण विरोधी समितीच्या वतीने शनिवारी डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात 'राष्ट्रीय आरक्षण संवर्धन परिषद' आयोजित करण्यात आली होती. उद्‌घाटन उद्योजक गुणवंत देवपारे यांच्या हस्ते झाले. यावेळी खा. श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री आ. राजकुमार बडोले, वरिष्ठ वकील शैलेश नारनवरे, चर्मकार महासंघाचे प्रदेश अध्यक्ष संजय खामकर, मालेपल्ली लक्ष्मैया (हैदराबाद), अरविंद गेडाम, कुलदीप रामटेके, डॉ. संजय रामटेके, रमेश कटके आदी मान्यवर उपस्थित होते. खासदार श्यामकुमार बर्वे म्हणाले, संविधानामुळे मागासवर्गीयांना अनेक अधिकार मिळाले आहेत. संविधानामुळेच आपल्याला आंदोलन करता येते. संविधानामुळे हा समाज शिक्षित होत असून प्रश्न विचारतो आहे. हे काहींना मान्य नाही. त्यामुळे उपवर्गीकरण आणि इतर विषयांद्वारे ते समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत. माजी मंत्री राजकुमार बडोले म्हणाले, उपवर्गीकरण हे समाजात फूट पाडण्याचा प्रकार असून या विरोधात सर्वांना एकजुट होण्याची गरज आहे. वरिष्ठ वकील नारनवरे यांनी सांगितले, उपवर्गीकरण घटनेच्या विरोधात आहे. सर्वोच्च न्यायालयातील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे हे प्रकरण आले होते. प्रक्रियेनुसार पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे प्रकरण जायला हवे होते, परंतु हे प्रकरण त्यापेक्षा वरिष्ठ खंडपीठाकडे पाठवले गेले. हा मोठा प्रश्न असल्याचे त्यांनी नमूद केले. गुणवंत देवपारे, डॉ. संजय रामटेके यांनीही विचार मांडले. संचालन अमन कांबळे आणि प्रीतम बुलकुंडे यांनी केले. ॲड. आकाश मून आणि ॲड. स्मिता कांबळे यांनी भूमिका स्पष्ट केली. चर्मकार महासंघाचे संजय खामकर म्हणाले की मातंग समाजाचे सुनील वारे यांच्या माध्यमातूनच बार्टीने उपवर्गीकरणाचा अहवाल दिला. यात चर्मकार समाजाची लोकसंख्या खोटी ठरविण्यात आली. फक्त मातंग या एकाच समाजाचा विचार करून उपवर्गीकरण करण्यात येत आहे. समाजात फूट पाडण्याचा हा प्रयत्न आहे.

### नागपुरातील मुलींवरील अत्याचाराचे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालविले जावे

**नागपूर : दैनिक संध्या**

नरसापूर प्रकरणाच्या धर्तीवर भंडारा तसेच नागपुरातील मुलींवरील अत्याचाराचे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालविले जावे आणि या दोन्ही प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा मिळावी, यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी करणार असल्याचे शिवसेना नेत्या आमदार निलम गोऱ्हे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. भंडारा येथील चिमुकलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरण तसेच हुडकेश्वरमधील मुलीवरील अत्याचार आणि तिच्या हत्येच्या प्रयत्नाच्या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी आ. गोऱ्हे आज नागपुरात आल्या होत्या. नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांनी भंडारा प्रकरणाची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी हुडकेश्वर पोलिस ठाण्यात जाऊन सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, उपायुक्त रश्मिता राव आणि अन्य अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी पीडित मुलीच्या वडिलांशीही फोनवरून संवाद साधला. यानंतर त्यांनी पत्रकार परिषदेत या दोन्ही प्रकरणावर बोलताना मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच पोलिस महासंचालकांकडे या प्रकरणांचा पाठपुरावा करणार असल्याचे म्हटले. हुडकेश्वरमधील प्रकरणात आरोपी निर्भय पाखरे उर्फ मेहरा याने पीडित मुलीवर सूड उगविल्यासारखा अत्याचार केला. त्याने वापरलेले उत्तेजक ड्रग्ज, शस्त्र बघता गुन्हा करताना तो आणखी कुणाला काही दाखवत होता का, इशारा देत होता का, अशी शंका आहे. त्याचे आणखी काही साथीदार असावेत, अशीही शंका असून त्याने अशाच प्रकारे इतर कोणत्या ठिकाणी, दुसऱ्या कुणासोबत असे गुन्हे केले का, त्याचा शोध घेण्याची गरज असल्याचे त्या म्हणाल्या. आरोपी पाखरेची गुन्ह्याची पद्धत फारच क्रूर आहे. अशात त्याचे सर्व उघड झाले असताना त्याला वाचविण्यासाठी महागड्या वकिलांची फी कुणी भरली, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. अशा आरोपीला वाचविण्याचे प्रयत्न होणे, खेदजनक असल्याचे आ. गोऱ्हे म्हणाल्या. आरोपीच्या या कृत्यामागे काही षडयंत्र आहे का, याचीही चौकशी होण्याची गरज आहे. स्वतःला विद्वान समजणाऱ्या कोणत्याच वकिलाने अशा आरोपींचे वकिलपत्र घेऊन त्याला मदत करू नये, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. हुडकेश्वर प्रकरणात नागपूर पोलिसांनी दाखविलेली तत्परता आणि मुलीची सुटका करून आरोपीला अटक करण्यासाठी बजावलेली कामगिरी प्रशंसनीय आहे. पोलिसांनी थोडी जरी हयगय केली असती तर कदाचित मुलीचा जीव गेला असता. दरम्यान, या सर्व प्रकरणात न्यायालयातून आरोपींचा केवळ दोन दिवसांचा पीसीआर मिळत असेल तर अशा प्रकरणासंबंधाने मा. सर्वोच्च न्यायालयाने विचार करण्याची गरज असल्याचेही त्या म्हणाल्या.

# विक्रोळी-भांडुप मार्गावर दररोजच कोंडी

**१.५ किमीसाठी लागतो अर्धा तास; मेट्रोचे बांधकाम आणि उड्डाणपुलाचा परिणाम**

■ मुंबई (दै. संध्या)

शहरात विक्रोळी आणि भांडुप दरम्यानच्या पूर्व द्रुतगती महामार्गावर वाहनचालकांना सायंकाळी साडेपाच ते रात्री साडेऊ वाजेपर्यंत तीव्र वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे. ज्याचे प्रमुख कारण विक्रोळी-जोगेश्वरी मेट्रोचे बांधकाम आणि नवीन उड्डाणपूल आहे. यामुळे या भागातील वाहतूककोंडी अधिक गंभीर होऊन प्रवाशांचे हाल होत आहेत.

विक्रोळी उड्डाणपूल ओलांडल्यानंतर थेट भांडुपपर्यंत वाहने कोंडीत अडकतात. विक्रोळी-जोगेश्वरी मेट्रो मार्ग आणि मानखुर्द येथील सिग्नलचा मोठा अडथळा दूर झाल्याने विक्रोळी ते जेव्हीएलआर या परिसरात नवा बॉटलनेक तयार झाला आहे. सायंकाळी साडेपाच ते रात्री साडेऊ वाजेपर्यंत जेमतेम दीड किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी वाहनचालकांना अनेकदा अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ खर्ची घालावा लागतो. पूर्वी मानखुर्द भागात पूर्व द्रुतगती महामार्गाला थेट जोडणारा उड्डाणपूल नव्हता. त्यामुळे वाशी आणि ईस्टर्न फ्रीवेवरून येणाऱ्या वाहनांना मानखुर्द सिग्नलचा मोठा अडथळा होता. त्यामुळे वाहनांचा मोठा लोंढा एकदम महामार्गावर येत नव्हता. उड्डाणपूल झाल्याने सिग्नलचा अडथळा दूर झाला आणि मोठ्या प्रमाणावर वाहने महामार्गावर येऊ लागली. पुढे ही वाहतूक विक्रोळी उड्डाणपुलाच्या पुढे एकवटू लागली आहे. पश्चिम पुलाची भर : या नव्या उड्डाणपुलामुळे एलबीएस मार्गावरून वाहने मोठ्या संख्येने पूर्व द्रुतगती महामार्गावर येतात. उड्डाणपुलामुळे महामार्गावरील वाहनांच्या संख्येत भर पडली आहे. वाशी, ईस्टर्न फ्री वे, विक्रोळी नवा उड्डाणपूल आणि सीएसएमटीहून ठाण्याच्या दिशेने येणारी वाहने, यामुळे एकत्रित वाहनांची संख्या वाढून बॉटलनेक



तयार झाला आहे. ठाण्याच्या दिशेने जाणारी वाहने उड्डाणपुलावरून न जाता खालून गेल्यास वाहतूककोंडीत आणखी भर पडते. त्यामुळे अनेकदा मुलुंडच्या अलीकडे वाहतूक खोळंबते. टोलनाक्यावर गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागतात.

## कुंभमेळा प्राधिकरण बरखास्त करा, स्मार्ट सिटीकडून पैसे वसूल करा

■ नाशिक(दै. संध्या)

शहरातील रस्त्यांची झालेली चाळण आणि नागरिकांमध्ये वाढलेला रोष यासाठी विविध शासकीय यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव कारणीभूत असल्याचा आरोप करत सत्ताधारी आणि विरोधकांनी थेट कुंभमेळा प्राधिकरणाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. महापालिका आयुक्त आणि अधिकारी सक्षम असताना स्वतंत्र कुंभमेळा आयुक्ताची गरज काय, असा सवाल उपस्थित करीत प्राधिकरण बरखास्त करण्याची मागणी महासभेत करण्यात आली.

शहरातील खड्डे, रस्त्यांची दुरवस्था आणि सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नावाखाली सुरू असलेल्या विविध कामांवर चर्चेसाठी



विशेष महासभा शनिवारी (दि. ८) आयोजित करण्यात आली होती. प्रारंभीच त्यात नाशिकच्या खड्ड्यांबाबत थेट मुख्यमंत्र्यांना दखल घ्यावी लागते मग नाशिकच्या लोकप्रतिनिधींमध्ये काम करण्याची कुवत नाही का असा सवाल उपस्थित करीत विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांच्या कार्यपद्धतीवरही नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. महापालिकेला विश्वासात न घेता कामे पुढे रेटली जात असल्याचा आरोप करण्यात आला. एकाच रस्त्यावर वेगवेगळ्या यंत्रणांकडून वारंवार खोदकाम होत असल्याने वाहतूक कोंडी, खड्डे आणि अपघातांचा सामना नागरिकांना करावा लागत असल्याचे नगरसेवकांनी सांगितले. खड्डे बुजविण्यासाठी अद्याप निविदाच काढण्यात आलेली नसल्याचा मुद्दा केशव पोरजे यांनी उपस्थित केला. राहुल दिवे यांनी डांबराच्या निविदेत ठेकेदारांची 'रिंग' असल्याचा आरोप केला.

## खनिज क्षेत्रावर आता २४ तास डिजिटल नियंत्रण

■ नागपूर (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या खनिज प्रशासनाने पारदर्शकता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ घालत ई-गव्हर्नन्सच्या क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू केला आहे. 'आयएलएमएस २.०' (एकात्मिक खाणपट्टा व्यवस्थापन प्रणाली) या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून राज्यातील संपूर्ण खनिज क्षेत्रावर आता २४ तास डिजिटल नियंत्रण ठेवले जात आहे.

या डिजिटल प्रणालीचे सर्वांत मोठे वेगळेपण म्हणजे मानवी हस्तक्षेपाशिवाय आणि मानवी चुकांना थारा न देता कार्यरत असणारी तिची स्वयंचलित सुरक्षा यंत्रणा. राज्यातील सर्व खाणींचे अचूक भौगोलिक स्थानांक डिजिटल स्वरूपात नोंदवून संपूर्ण खाण क्षेत्र 'जिओ-फेन्सिंग' म्हणजेच डिजिटल कुंपणाद्वारे वेढण्यात आले आहे. या प्रणालीच्या तांत्रिक नियमांमुळे खाण क्षेत्राच्या सीमेबाहेरून बनावट ई-ट्रान्झिट पास (ई-टीपी) तयार करणे पूर्णतः अशक्य बनले आहे. केंद्र शासनाच्या 'युनिफाइड मायनिंग पोर्टल'शी थेट डिजिटल पद्धतीने जोडलेली ही यंत्रणा लिलाव प्रक्रियेपासून ते उत्पादनापर्यंतचा संपूर्ण प्रवास पारदर्शक करते. सध्या राज्यातील सर्व कोळसा व्यापारी, साठेदार, वॉशरी चालक आणि अंतिम वापरकर्त्यांची नोंदणी ६५ टक्के पूर्ण झाली आहे.

## मुंबई-नाशिकदरम्यान घोटीला १४० ऐवजी आता ७० रुपये टोल

■ नाशिक (दै. संध्या)

नाशिकहून मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांना आता घोटी टोल नाक्यावर अर्धाच टोल भरावा लागणार आहे. कार, जीप व व्हॅनसाठी १४० रुपयांऐवजी ७० रुपये आकारले जातील. समृद्धीचा टोल स्वतंत्र राहणार आहे. मुंबईहून नाशिककडे येणाऱ्यांनाही पडघा येथे अर्ध्या टोलचा लाभ मिळेल. त्यामुळे दुहेरी टोलचा आर्थिक भार काही प्रमाणात कमी होऊन नियमित प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

समृद्धी महामार्गामुळे नाशिक प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. त्यामुळे वेळ वाचविण्यासाठी वाहनचालकांकडून या मार्गाचा वापर वाढला आहे. मात्र, घोटी येथे १४० रुपये आणि त्यानंतर समृद्धीचा स्वतंत्र टोल अशी दुहेरी आकारणी होत असल्याने वाहनचालकांच्या खिशावर अतिरिक्त भार पडत होता. या आकारणीविरोधात वाहनचालक, व्यापारी आणि लोकप्रतिनिधींनी सवलतीची मागणी केली होती. नव्या निर्णयामुळे समृद्धी वापरणाऱ्या कारचालकांची प्रत्येक फेरीला घोटी टोलपोटी सुमारे ७० रुपयांची बचत होणार आहे. मुंबईहून नाशिककडे येणाऱ्यांनाही याचा लाभ मिळणार असून, समृद्धीचा वापर केल्यास पडघा येथे अर्धाच टोल आकारला जाणार आहे. त्यामुळे दोन्ही दिशांना दुहेरी टोलचा भार कमी होऊन नियमित नाशिक प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

## गुडघाभर पाण्यातून जावं लागतं शाळेत; ३ वर्षांनंतरही रस्ता अपूर्णच

■ नाशिक (दै. संध्या)

बागलाण तालुक्यात विकासकामांच्या नावाखाली होत असलेल्या दिरंगाईचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. भवाडे गावातील दगडीटेक आदिवासी वस्तीपर्यंत जाणाऱ्या रस्ता व पुलाच्या कामासाठी तब्बल काही लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन तीन वर्षांचा कालावधी उलटला, तरी काम पूर्ण झालेले नाही. परिणामी, भर पावसात आदिवासी बांधवांना आणि शाळकरी चिमुकल्यांना गुडघाभर पाण्यातून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

सह्याद्रीच्या पश्चिम डोंगररांगांमध्ये वसलेल्या भवाडे येथील दगडीटेक वस्तीवर सुमारे १०० ते १५० नागरिक वास्तव्यास आहेत. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके



उलटूनही या वस्तीला मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.

२०२४ मध्ये रस्ता व पुलाचे काम सुरू करण्यात आले. मात्र, तीन वर्षांनंतरही काम अपूर्णच असून नागरिकांच्या पदरी निराशाच आली आहे.

# गडचिरोलीचा कायापालट !

## १५ कंपन्या स्टील उद्योगासाठी मैदानात

■ नागपूर (दै. संध्या)

औद्योगिक जिल्हा म्हणून नवी ओळख निर्माण करण्याच्या दिशेने गडचिरोलीची वाटचाल सुरू झाली आहे. लोह व पोलाद उद्योग उभारण्यासाठी तब्बल १५ कंपन्या पुढे सरसावल्या असून, त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे जमिनीसाठी अर्ज केले आहेत.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली भविष्यात देशाचे 'स्टील हब' बनेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. या दिशेने आता प्रत्यक्ष हालचालींनाही वेग आला आहे. खुद्द जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी ही माहिती दिली. यापैकी निम्म्या कंपन्यांनी जरी प्रत्यक्ष प्रकल्प उभारले, तरी गडचिरोली महाराष्ट्रातील सर्वाधिक समृद्ध जिल्ह्यांपैकी एक बनेल. गडचिरोलीत उच्च प्रतीच्या लोहखनिजाचे मोठे साठे असल्याने अनेक कंपन्यांना जिल्ह्याबाबत आकर्षण निर्माण झाले आहे. एका खासगी कंपनीचे दोन प्रकल्प सध्या निर्माणाधीन आहेत. कोन्सरी, हेडरी येथेही प्रकल्प उभारण्यात येत आहे. या दोन्ही प्रकल्पांतून पुढील वर्षी उत्पादन सुरू होण्याची अपेक्षा असल्याचे पंडा यांनी सांगितले. विशेष म्हणजे गडचिरोली जिल्ह्यातील दक्षिणेकडील सिरोंचा येथे बहुविशेषोपचार रुग्णालय उभारण्यात येत आहे. या रुग्णालयाचे काम वेगाने सुरू असल्याचे पंडा यांनी सांगितले.

या उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. वडसा-गडचिरोली रेल्वेमार्गासाठीचे भूसंपादन पूर्ण झाले असून, फेब्रुवारी २०२७ मध्ये गडचिरोली शहर रेल्वेने जोडले जाण्याची अपेक्षा आहे. भारतीय रेल्वेला हा मार्ग तेलंगणातील सिरपूर कागजनगरपर्यंत वाढवायचा आहे. हा मार्ग चामोर्शी, कोन्सरी आदी भागांतून जाईल. गोंडवाना विद्यापीठा अंतर्गत खाणकाम, धातुकर्म, उत्पादन अभियांत्रिकी आणि संगणकशास्त्र या विषयांमध्ये पदविका आणि पदवी अभ्यासक्रम सुरू करणारे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले जाणार आहे. पदविका अभ्यासक्रम सुरू झाले असून, पदवी अभ्यासक्रम याच वर्षी सुरू होणार आहेत. गडचिरोली शहर समृद्धी द्रुतगती महामार्गाशी जोडले जाणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) या महामार्गाचा प्रारंभबिंदू असलेल्या शिवमडका येथून भंडारामार्गे गोंदियाला जोडणी करणार आहे. भंडारा पुढे गडचिरोलीशी जोडला जाणार आहे. केंद्र सरकारने 'मायनिंग कॉरिडॉर' प्रकल्पांतर्गत गडचिरोली ते सुरजागड द्रुतगती मार्ग उभारण्याचा निर्णय घेतला आहे. गडचिरोली शहरासाठी बाह्यवळण रस्त्यालाही मंजुरी दिली आहे. कारखाने आणि खाणी सुरू होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने गडचिरोली शहराजवळ विमानतळ उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

विमानतळ कार्यान्वित होईपर्यंत त्यासाठी पुरेसे प्रवासी उपलब्ध होतील आणि महानगरांशी हवाई जोडणीला चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. दक्षिण गडचिरोलीमध्ये अनेक दिवस वीजपुरवठा खंडित होण्याची समस्या आहे. जंगलातील वीजवाहिन्यांचे टॉवर कोसळल्यानंतर ते पुन्हा उभारण्यासाठी बराच वेळ लागतो.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: गांव मौजे हिवरे बुद्रुक, ता. जुन्नर जि. पुणे येथील लोकांस या जाहिर नोटीसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत गांव मौजे हिवरे बुद्रुक येथील खाते क्र. २२० वरील जमीन गट/सर्वे नं. ७६० चे विद्यमान मालक श्री. अरविंद भिकाजी भोर, रा. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे. यांचे स्वतंत्र मालकीची जमीन मिळकत असून, सदरची मिळकत ही १) सौ. सारिका ठकसेन घेगडे, रा. ओझर, ता. जुन्नर जि. पुणे व २) सौ. मयुरा जगदीश हांडे, रा. उंब्रज नं. १, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

खालील परिशिष्ट मध्ये नमुद मिळकत ही निर्वेध व निजोखमी असलेबाबत भरोसा व अशी हमी खरेदीदार यांना वर नमुद केलेले विदयमान मालक यांनी दिलेला आहे. तरी देखील सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, अधिकार, दावा, ताबा म्हणजेच गहाण, दान, लीज, लिन, बक्षिस, खरेदी-विक्री, साठेखत, चोळी, बांगडी, वाटप, पोटगी, रस्ता, वहीवाट, कुळ, इतर वारसां हक्क इत्यादी स्वरुपाचे अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार तसेच हित संबध अथवा इतर कोणताही मालकी हक्क नाही, असे आमचे अशिलास खात्रीलायक सांगितलेले आहे. तरी देखील सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाचे आत आमचे अशिलांचे पत्त्यावर योग्य त्या सबळ पुराव्या निशी संपर्क साधावा व तशी खात्री करुन दयावी. अन्यथा सदरची मिळकत निर्वेध निजोखीम आहे असे समजुन सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीव पुर्वक सोडून दिलेला आहे. असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही. याची नोंद घ्यावी. म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

: परिशिष्ट :

१) मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे पोट तुकडी जुन्नर ता. जुन्नर, तसेच मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर, यांचे हद्दीतील गाव मौजे हिवरे बुद्रुक, ता. जुन्नर, जि. पुणे येथील खाते क्र.२२० वरील शेतजमीन मिळकत.

| गट/सर्वे नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
| --- | --- | --- |
| १) ७६० | ०.४७.०० | ०.७५ |

यांसी चतुः सिमा रेकॉर्डस ऑफ राईटस् प्रमाणे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस

जुन्नर, सही/-

ता. १०/०८/२०२६ ॲड. नंदकुमार मोतीराम चौधरी, जुन्नर



## थोडक्यात पण महत्वाचे



### मिसिंग लिंकनंतरही लोणावळा वाहतूककोंडीतच;

पिंपरी : दैनिक संध्या

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर लोणावळा शहरातील वाहतुकीचा ताण कमी होईल, असा दावा शासनाकडून करण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात चित्र पूर्णपणे वेगळे असून, मागील तीन दिवसांत लोणावळ्यात झालेली अभूतपूर्व वाहतूक कोंडी पाहता शासनाचा हा अंदाज सपशेल चुकीचा ठरला असल्याचे स्पष्ट झाले आहे. आषाढ महिन्यातील शेवटचा रविवार लोणावळा शहर आणि ग्रामीण परिसरासाठी प्रचंड वाहतूक कोंडीचा ठरला असून, पर्यटनस्थळांवर पर्यटकांचा जनसागर उसळला होता. शहरांतर्गत भागात सेंटर पॉईंट हॉटेल ते नाझर कॉर्नरपर्यंत वाहनांच्या लांब रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. राष्ट्रीय महामार्गाप्रमाणेच लोणावळा शहर, ग्रामीण भाग आणि पवनानगर परिसरातील सर्व पर्यटनस्थळांकडे जाणारे मार्ग वाहनांनी गच्च भरले होते. भुशी डॅम, पवनानगर परिसर तसेच विविध पर्यटन स्थळांवर अक्षरशः पाय ठेवायलाही जागा नव्हती. पर्यटकांच्या या उदंड प्रतिसादामुळे परिसरातील सर्व हॉटेल्स, खासगी बंगले आणि फार्म हाऊस तुडुंब भरले होते. येत्या गुरुवारपासून श्रावण महिना सुरू होत असल्याने, आषाढाच्या शेवटच्या विकेंडचा आनंद घेण्यासाठी आणि मांसाहारी खाद्यपदार्थांच्या पार्ट्या करण्यासाठी शुक्रवारी, शनिवारी आणि रविवारी हजारो पर्यटकांनी लोणावळ्यात गर्दी केली होती. त्यामुळे मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर वाकसाई फाटा ते पाथरगाव दरम्यान वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सुमारे ८ ते १० किलोमीटर अंतरापर्यंत राष्ट्रीय महामार्ग पूर्णपणे ठप्प झाला होता. अगदी अंतरा-अंतरावरील किरकोळ प्रवासासाठी वाहनचालकांना तासनतास गाडीतच ताटकळत राहावे लागले, ज्यामुळे पर्यटकांचा संडे पूर्णपणे वाहतूककोंडीतच गेला. या महाकोंडीमुळे स्थानिक नागरिकांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले होते. शहरातील व महामार्गावरील ही वाहतूककोंडी सोडवताना पोलिस प्रशासनाची मोठी दमछाक झाली. मात्र, रस्त्यावर वाहनांची संख्याच एवढी प्रचंड होती की, वाहतूक सुरळीत करताना पोलिसांच्या नाकी नऊ आले होते. मिसिंग लिंकनंतरही लोणावळ्याची वाहतूककोंडीची समस्या कायम राहिल्याने भविष्यात यावर कायमस्वरूपी काय उपाययोजना केली जाणार का?, असा प्रश्न आता नागरिक आणि पर्यटकांकडून उपस्थित केला जात आहे.

### पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निष्काळजीपणामुळे दुर्घटनेची भीती

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निष्काळजीपणाचा आणखी एक धक्कादायक नमुना कासारवाडीत समोर आला आहे. कासारवाडी–पिंपळे गुरव या वर्दळीच्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलावाची जुनी संरक्षक भिंत अनेक महिन्यांपासून अर्धवट ढासळलेल्या अवस्थेत आहे. ती थेट पदपथालगत उभी आहे. सततच्या पावसामुळे भिंतीची अवस्था अधिकच धोकादायक बनली असून, ती कधीही कोसळून मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. यामध्ये आणखी गंभीर बाब म्हणजे जीर्ण झालेल्या या भिंतीला खेटून महावितरण (एमएसईबी) विभागाचा मोठा केबल रोल ठेवण्यात आला आहे. या अवजड केबल रोलचा अतिरिक्त भार आधीच कमकुवत झालेल्या भिंतीवर पडत असल्याने ती कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता अधिक वाढली आहे. त्यामुळे पदपथावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे जलतरण तलावाच्या आवारात महापालिकेने नव्याने मजबूत संरक्षण भिंत उभारली आहे. मात्र, त्याच्याबाहेरील जुनी व जीर्ण झालेली भिंत हटविण्याऐवजी तशीच सोडून देण्यात आली आहे. नवीन भिंत उभारल्यानंतरही धोकादायक ठरलेली जुनी भिंत पाडण्यात आलेली नसल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते संबंधित विभागाला या धोकादायक स्थितीची माहिती असूनही अनेक महिन्यांपासून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासन एखाद्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या मार्गावरून दररोज शेकडो नागरिक, शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. जलतरण तलावाच्या शेजारीच उद्यान असल्यामुळे संध्याकाळी व सकाळी उद्यानात जाणारे नागरिक याच पदपथाचा वापर करतात. पदपथालगतच ढासळलेली ही भिंत असल्याने पादचाऱ्यांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. पावसामुळे माती खचत असून, भिंतीची पकड कमकुवत झाली आहे. त्यातच भिंतीला लागून ठेवलेल्या एमएसईबीच्या अवजड केबल रोलमुळे भिंतीवर अधिक ताण निर्माण होत असून, मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

### पिंपरी बाजारात भाजीपाल्याचे दर घसरले;

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी: पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी (दि. 9) ऑगस्ट रोजी बाजारात फळभाज्यांमध्ये भेंडी, शिमला, रताळी यांची आवक वाढली असून दरही कमी झाले आहेत. तर पालेभाज्यांच्या दरातही घसरण झाली असून कोथिंबीरची जुडी १० रुपये दराने विक्री केली जात आहे; तसेच रानभाजी कर्टुलीची मोठी आवक झाली असूनही ३०० रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. एकादशीमुळे रताळ्यांची आवक झाली असून ८० रुपये प्रति किलोप्रमाणे ग्राहक खरेदी करत आहेत. फळभाज्यांचे दर : रविवारी बाजारात टोमॅटो ३०, भेंडी ६०, फ्लॉवर ४०, कोबी ३०, मिरची ६० रुपये, गाजर ४०, शिमला ६०, लसूण १८० - २००, आले १२० - १४०, वांगी ४०, काकडी ३०, कारले ६०, कांदे २५ -३० रुपये किलो, बटाटा २५ - ३० रुपये किलो, बिन्स १०० रुपये किलो, पावटा ८०, लाल भोपळा ५०, घोसाळी ५०, दोडका ६०, तोंडली ६०, बीट ४० रूपये, दुधी भोपळा ५०, गवार ८० रुपये, शेवगा १००, घेवडा १०० रुपये प्रतिकिलो प्रमाणे विक्री केली जात आहे. कोथिंबीर १० - १५ रुपये, मेथी २०, पालक २०, शेपू १५, राजगिरा २०, पुदिना १५, मुळा २५, चवळई १५, लाल माठ १५, हिरवा माठ १५, करडई २०, कांदापात २५, करडई १५, आळू पाने १० रुपये जुडी, आंबट चुका १५ रुपये. फळभाज्यांचे : किलोचे भाव (किरकोळ रु.) शेवगा ११० रुपये, गवार १००, पावटा ८० - ९०, तोंडली ८०, बीट ४० - ५०, दोडका ७०, कारली ७०, भरताची वांगी ५०, भेंडी ७०, मिरची ७०, फ्लॉवर ५०, कोबी ३०, वांगी ५०, घोसाळे ५०, पडवळ ५०, दुधी भोपळा ५०, पापडी ९०, पावटा १००, सुरण ९० रूपये, मद्रास काकडी ३० रुपये, सिमला ७०, राजमा १०० - १२०, बिन्स १००, गाजर ५०, रताळी ८० रुपये, तर टोमॅटो ४० रुपये प्रतिकिलो प्रमाणे विक्री केली जात आहे. कांदा १७, बटाटा १०, लसूण १००, आले ३५ , भेंडी २५, गवार ४५, टोमॅटो १५, वाटाणा १००, घेवडा ४५, दोडका ३५, हिरवी मिरची ३५, दुधी भोपळा २५, काकडी १५, कारली ३५, गाजर २५, फ्लॉवर १२, कोबी १०, ढोबळी ३०, वांगी ३०, शेवगा ४५, घोसाळी ३०, लिंबू २५, मका कणीस १०० रुपये प्रतिकिलो दर होते.

# पत्रकार संघाकडून सदस्यांना उच्च दर्जाच्या रेनकोटचे वाटप

■ पिंपरी (दै. संध्या)

पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून कोणत्याही ऋतूमध्ये जनतेपर्यंत अचूक आणि तत्पर माहिती पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असतात. त्यांच्या या कर्तव्याची दखल घेत अखिल मराठी पत्रकार संस्था संलग्न पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार सदस्यांना उच्च दर्जाच्या रेनकोटचे वाटप करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील पत्रकार कक्षात झालेल्या कार्यक्रमात स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते रेनकोटचे वितरण करण्यात आले.

यावेळी अखिल मराठी पत्रकार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब गोरे, शहराध्यक्षा सायलीताई कुलकर्णी तसेच पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघाचे पदाधिकारी, सभासद आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पत्रकारांच्या सामाजिक योगदानाचा गौरव करत संघाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

अखिल मराठी पत्रकार संस्था संलग्न पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघ हा पत्रकारांच्या विविध समस्या सोडविणे, त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच विविध शासकीय सवलती मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. पत्रकारांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे संघटनेची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

यावेळी बोलताना बापूसाहेब गोरे म्हणाले, "पत्रकारांना उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा अशा तिन्ही ऋतूंमध्ये कोणतीही सबब न सांगता घटनास्थळी




जाऊन बातमीदारी करावी लागते. विशेषतः पावसाळ्यात अनेक अडचणींचा सामना करत काम करावे लागते. अशा परिस्थितीत पत्रकारांना पावसापासून संरक्षण मिळावे आणि त्यांचे काम अधिक सुलभ व्हावे, या उद्देशाने उच्च दर्जाच्या रेनकोटचे वाटप करण्यात आले आहे. पत्रकार हे समाजाचे चौथे स्तंभ असून त्यांच्या कार्याला आवश्यक सुविधा मिळणे ही काळाची गरज आहे."

यावेळी संघटनेच्या अध्यक्षा सायली कुलकर्णी, उपाध्यक्ष विनय लोंढे, उपाध्यक्ष रेहान सय्यद, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील कांबळे, सरचिटणीस संतोष जराड, चिटणीस मुकेश जाधव, प्रसिद्धी प्रमुख युनूस खतीब, डिजिटल मीडिया अध्यक्ष सुरज साळवे,अशोक लोखंडे,अमोल डंबाळे, शबनम सय्यद,विश्वास शिंदे यांच्यासह संघटनेचे अनेक पत्रकार सदस्य उपस्थित होते.

या उपक्रमामुळे पत्रकार सदस्यांनी समाधान व्यक्त करत पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघाच्या पत्रकारहिताच्या सातत्यपूर्ण कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संघाच्या माध्यमातून भविष्यातही पत्रकार कल्याणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचा विश्वास यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## निगडीत संत तुकाराम महाराज पालखीतील वारकऱ्यांसाठी भाजपकडून अन्नदान

■ पिंपरी (दै. संध्या)

संत तुकाराम महाराज पालखीचा परतीचा प्रवास सुरू असताना रविवारी (दि.९ ऑगस्ट) निगडी येथील मधुकर पवळे उड्डाणपुलाखाली वारकरी बांधवांसाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने अन्नदान व चहा-नाश्ता वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजप कार्यकर्ते सचिन काळभोर यांच्या पुढाकाराने हा सेवा उपक्रम पार पडला.

पालखीचे निगडी येथे आगमन झाल्यानंतर पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या सुमारे तीन हजार वारकरी बांधवांना चहा, नाश्ता, बिस्किटे आणि पाण्याच्या बाटल्यांचे मोफत वाटप करण्यात आले. वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने सेवा बजावली. वारकरी सेवेला धार्मिक आणि सामाजिक बांधिलकीची जोड देत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला वारकरी बांधवांकडूनही






उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परतीच्या प्रवासात थकलेल्या अल्पोपहार व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला. या अन्नदान उपक्रमासाठी बबन शिवणेकर, केशव वाघमारे, तानाजी जांभूळकर, भरत राठोड, राकेश सिंग, अनिल शिर्के, बबनराव दळवी, जयदेव भुवड, गौरव रोधाळे, सुरेश चव्हाण, वैशाली पाठणेकर, दादा हाठले, भाई मिस्त्री, अजय पेडणेकर, जगदीश चौधरी, फुआराम चौधरी आणि अक्रम शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.वारकरी बांधवांची सेवा हीच खरी भक्ती मानून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सचिन काळभोर यांनी सांगितले. पालखी सोहळ्याच्या निमित्ताने वारकरी बांधवांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला.

## कामिका एकादशीनिमित्त आळंदीत इंद्रायणी नदीच्या काठावर महाआरती

■ पिंपरी (दै. संध्या)

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पावन नगरी आळंदी येथे कामिका एकादशीनिमित्त इंद्रायणी नदीच्या तीरावर भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले. या वेळी वारकरी, ग्रामस्थ आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिभावाने महाआरतीत सहभाग नोंदविला.



दर एकादशीला आळंदीतील इंद्रायणी नदीच्या काठावर महाआरती आयोजित करण्याची परंपरा असून, यामागे इंद्रायणी नदीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच तिच्या पावित्र्याचे जतन आणि संवर्धन करण्याचा संदेश दिला जातो. आळंदी नगरपरिषद आणि देवस्थान संस्थेच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येतो. उत्तर भारतातील काशी येथे गंगा नदीला जसे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे, त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायासाठी इंद्रायणी नदीला विशेष स्थान आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या सान्निध्यामुळे इंद्रायणीचे महात्म्य अधिक वृद्धिंगत झाले असून, या पवित्र नदीप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भाविक मोठ्या श्रद्धेने महाआरतीत सहभागी झाले.१महाआरती दरम्यान इंद्रायणीच्या तीरावर "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भक्तिरसाने ओतप्रोत भरलेल्या वातावरणात भाविकांनी आरतीचा आनंद लुटला. यावेळी उपस्थितांनी इंद्रायणी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त ठेवण्याचा संकल्पही व्यक्त केला. भक्ती, श्रद्धा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी ही महाआरती आळंदीकरांसह वारकरी आणि भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरली.

## युद्धजन्य परिस्थितीवर गांधी मार्ग हेच उत्तर : डॉ. दिलीप गरुड

■ पिंपरी (दै. संध्या)

०९ ऑगस्ट क्रांती दिना निमित्त आज पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कडून इतिहास स्वातंत्र्य चळवळीचा कथाक्रांतीच्या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले, प्रसिद्ध व्याख्याते डॉ.दिलीप गरुड यांनी स्वातंत्र्य चळवळीतील अनेक स्वातंत्र्यवीरांच्या कथा, कहाण्या, वीरगाथा सांगत उपस्थितांना प्रेरित केले.

पिंपरी चौकातील एका हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्याना मध्ये डॉ. दिलीप गरुड म्हणाले, "गांधी मार्ग हेच आजच्या परिस्थितीवर उत्तर आहे जगात क्रांती आणि सलोखा राखून बंधू भावाने जगायचे असेल तर गांधी विचारानुसार वाटचाल करावी लागेल, तरच जगात शांतता राहील.

आजचा माणूस भ्रष्ट व मूल्यहीन जीवन पद्धतीकडे ओढला जात आहे, मतदानाच्या दिवशी माणसं उत्स्फूर्तपणे बाहेर पडत नाहीत, ती पैशासाठी घरी वाट बघत बसतात, ही लोकशाहीची अधोगती आहे. म्हणून माणसाला नीतिमत्तेबरोबरच, तत्त्वनिष्ठता व संस्कारशीलतेची जोड दिल्यास तो स्वाभिमानाने पुन्हा उभा राहील" असे विचार क्रांती दिनाच्या निमित्ताने डॉ. दिलीप गरुड यांनी मांडले.

देशाच्या क्रांतीचा, स्वातंत्र्य चळवळीचा, स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाचा विसर पडत चाललेल्या आजच्या युवा पिढीला मार्गदर्शक, दिशादर्शक, कार्यदर्शक प्रेरक असा क्रांतीचा इतिहास समजला जावा, या दृष्टीने आजच्या क्रांतीदिनी इतिहास स्वतंत्र चळवळीचा कथा क्रांतीच्या या व्याख्यानाचा आयोजन केले आहे, आजची सर्व स्तरात अपयशी ठरलेली राजकीय राजवट पाहता, शेतकरी विद्यार्थी कर्मचारी कामगार महिला उद्योजक सर्वांचेच पिळवणूक करणारी ही सत्ता बदलवून पुन्हा एकदा संविधान स्वातंत्र्याची लढाई लढावी लागेल,अशी परिस्थिती निर्माण होत चालली आहे आणि अशी लढाई लढायला देशाच्या क्रांतिकारकांचा इतिहास देशवासीयांपुढे मोलाची भूमिका बजावेल, असे काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे म्हणाले.

## भक्ती-शक्ती चौकात अण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्वानिमित्त बहारदार काव्यसंमेलन उत्साहात

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्व-२०२६ अंतर्गत भक्ती-शक्ती चौक, निगडी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक परिसरात निमंत्रित कवींचे बहारदार काव्यसंमेलन उत्साहात पार पडले. या काव्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी तथा पत्रकार पितांबर लोहार होते.

अध्यक्षीय भाषणात पितांबर लोहार यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. अण्णाभाऊंच्या साहित्याने आणि शाहिरीने समाजप्रबोधनाचे कार्य करत संयुक्त महाराष्ट्र चळवळीला बळ दिल्याचे त्यांनी नमूद केले.

या काव्यसंमेलनात सहभागी कवींनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्य, साहित्य, सामाजिक बांधिलकी आणि संघर्षमय प्रवासावर आधारित विविध कविता सादर करून उपस्थितांची मने



जिंकली. कवी सुनील भिसे, किशोर केदारी, विशाल कसबे, अनिल दीक्षित, दीपेश सुराणा, सुहास घुमरे, दत्तू ठोकळे, महेंद्र पाटोळे, आत्माराम हारे, संजय साळुंखे, विनोद अष्टूल, विलास रुपटक्के, पुरुषोत्तम हिंगणकर, विजय कांबळे, देवेंद्र गावंडे, अशोक टाकळे, अरुण कडलक, लहू साळवे, नितीन घोलप तसेच कवयित्री फुलवती जगताप, आशा शहाणे, केसरताई लांडगे, वर्षा सोनवणे, नलिनी सोनवणे, राजेश्वरी म्हैसने आणि पिया सोनवणे यांनी आपल्या उत्कृष्ट रचनांद्वारे अण्णाभाऊंना अभिवादन केले.

कवी पितांबर लोहार यांनी सादर केलेल्या 'अण्णाभाऊंची लेखणी' या कवितेला विशेष दाद मिळाली. तर सुनील भिसे यांच्या 'दीड दिवसाची शाळा', किशोर केदारी यांच्या 'समता', अनिल दीक्षित यांच्या 'अण्णाभाऊंची लेखणी', दीपेश सुराणा यांच्या 'लोकशाहीर अण्णाभाऊंना मानाचा मुजरा' आणि विशाल कसबे यांच्या 'अण्णांच्या कवितांना सलाम' या कवितांनी कार्यक्रमात रंगत आणली.

यावेळी सुहास घुमरे, आत्माराम हारे, दत्तू ठोकळे, फुलवती जगताप, संजय साळुंखे, विनोद अष्टूल, देवेंद्र गावंडे, विजय कांबळे, महेंद्र पाटोळे, आशा शहाणे आदी कवींनीही समाजप्रबोधन, समता, साहित्य आणि सामाजिक न्याय यांवर आधारित प्रभावी रचना सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ कवी सुनील भिसे यांनी केले. सूत्रसंचालन कवी तथा पत्रकार किशोर केदारी यांनी तर आभार प्रदर्शन विशाल कसबे यांनी केले.

## प्राधिकरण जेष्ठ नागरिक संघाची दुमजली वास्तू उद्घाटन सोहळा संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघाच्या नूतन इमारतीचा उद्घाटन सोहळा मा.ना. श्री.अण्णा दादू बनसोडे उपाध्यक्षः महाराष्ट्र विधानसभा आमदारः पिंपरी विधानसभा यांच्या शुभहस्ते कोनशिलेचे अनावरण व फीत कापून संपन्न झाला.श्री गणेश व कलश पूजन आणि सत्यनारायण पूजेनंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली.

मा. अण्णा बनसोडे यांचा सत्कार प्रा. ज्ये.नागरिक संघाचे अध्यक्ष श्री.चंद्रशेखर जोशी यांनी पुणेरी पगडी,शाल,श्रीफळ व गुलाबपुष्पाचे रोपटे देऊन केला. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात, संघाच्या दैदिप्यमान कार्याचा उल्लेख करताना , या नूतन इमारतीच्या उभारणीसाठी सक्रीय सहाय्य केले याबद्दल, मा. आमदारांचे आभार मानले.

याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर,नगरसेविका शैलजाताई मोरे,नगरसेवक श्री.अमित गावडे,सामाजिक कार्यकर्ते श्री.निलेश शिंदे,सौ.प्रितम शिंदे,श्री.बाळा दानवले,श्री. बाळा शिंदे,श्री,समीर जावळकर, श्री. अतुल इनामदार,श्री.अरुण थोरात,सौ. सरिता साने,श्री.धनंजय काळभोर,श्री. राजेंद्र बाबर, श्री.अमोल निकम,लायन्स क्लबच्या अध्यक्षा सौ.शिल्पी कुमार,श्री. सचिन बनसोडे, श्री.अरुण थोरात, महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ यांचा सत्कार शाल,श्रीफळ व गुलाबपुष्पाचे रोपटे देऊन केला. इमारत बांधकाम पुनर्विकास समितीतील श्री.सुभाष जोशी,श्री.आर.एस. कुमार,श्री. श्यामसुंदर परदेशी, श्री. सूर्यकांत मुथियान,श्री.शरद यन्नुवार. श्री. भगवान महाजन व श्री.बाळासाहेब साळुंखे या सर्वांचा सत्कार शाल,श्रीफळ, व गुलाबपुष्पाचे रोपटे देऊन करण्यात आला.

प्रा.जेष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष श्री.गुणवंत चिखलीकर,सौ भारती फरांदे, श्री.डॉ.दिगंबर इंगोले, श्री.जगन्नाथ वैद्य,सौ.डॉ.ज्योती इंगोले, श्री.दलीचंद शिंगवी,श्री मंगेश वर्टीकर,सौ. अर्चना वर्टीकर,श्री.आनंद मुळूक या सर्वांचा श्रीफळ व गुलाबपुष्पाचे रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. तसेच बांधकाम कंत्राटदार श्री.रणजीत झेंडे,सहकारी श्री. अमोल देवकर,आर्किटेक्ट श्री.मिलिंद किर्ती ,अभियंता श्री.किशोर बोटे ,पत्रकार श्री.नंदू साळुंखे,श्री.प्रमोद पवार या सर्वांचा सत्कार करण्यात आला.सौ वृषाली व विजय गुर्जर व दारासमोर अतिशय सुंदर रांगोळी काढलेले श्री.विश्वास फडणीस यांचा सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्या सौ.ज्योती कानेटकर यांचा सत्कार करण्यात आला.श्री. अण्णा बनसोडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राधिकरणात बांधलेली ही पहिलीच दुमजली इमारत आहे व लवकरच लिफ्टची व्यवस्था करण्यात येईल व आमचे कायम सहकार्य राहील अशी ग्वाही दिली! श्री.दिलीप गोसावी उपाध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुणे - नाशिक रेल्वे मूळ मार्गानेच व्हावी : नितीन गोरे

**चाकण : दैनिक संध्या**

पुणे - नाशिक रेल्वे ही पूर्वी झालेल्या सर्वेक्षणा नुसारच झाली पाहिजे, अशी आक्रमक भूमिका महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा नगरसेवक, गटनेते नितीन गोरे यांनी घेतली असून, गोरे यांनी या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे. केंद्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य, चाकण नगरपरिषदेचे गटनेते गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत खेड तालुक्यातील नागरिक मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरले होते. आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत नितीन गोरे यांनी शासनाचे लक्ष या मागणीकडे वेधण्याचा प्रयत्न केला. खेड, आंबेगाव आणि जुन्नर परिसराचा औद्योगिक, व्यापारी आणि शैक्षणिक विकास साधायचा असेल तर पुणे - नाशिक रेल्वे मूळ नियोजित सरळ मार्गानेच झाली पाहिजे. विशेषतः चाकण शहर आणि परिसरामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या औद्योगिकीकरणामुळे पुणे - नाशिक महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे.भविष्यात ही परिस्थिती अजूनही बिकट होणार आहे. म्हणून होणाऱ्या वाहतूक कोंडीला पर्याय म्हणून आणि पुढच्या पिढीच्या उज्वल भवितव्यासाठी या मार्गानेच रेल्वे मार्ग राहिला पाहिजे. पुणे - नाशिक रेल्वेचा प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा नसून सर्वसामान्य जनतेच्या विकासाचा प्रश्न असल्याने राज्य आणि केंद्र शासनाने यावर गांभीर्याने दखल घेऊन जीएमआरटीच्या संशोधन कार्याला बाधा न आणता पुणे - नाशिक रेल्वेचे काम मूळ मार्गानेच सुरू करावे, असे साकडे नितीन गोरे यांनी शासनाला घातले आहेत. स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा या आंदोलनाला जाहीर पाठिंबा असल्याचे नितीन गोरे यांनी स्पष्ट केले.

### सपकाळ यांनी माफी मागावी अन्यथा तोंडाला काळे फासू:गणपतराव फुलवडे

**वडगाव कांदळी : दैनिक संध्या**

काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार गुंगी गुडीया प्रतिक्रियेबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस , पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष गणपतराव फुलवडे यांनी उत्तर दिले. सपकाळ यांची बाष्कळ बडबड ऐकून चिड निर्माण झाली. खानदानी, सुसंस्कृत, अभ्यासू महिला दुःखी मनस्थितीत राजकारणातील महत्वाचे पद स्वीकारते हे मुळात मोठे धाडस होय.त्यांच्या राजकीय क्षमतेच मूल्यमापन एवढ्या लवकर करुन गुंगी गुडिया म्हणणे वेड्याच लक्षण आहे.वहिनीसाहेब यांनी अर्थमंत्री पद मागावे,अमुक तमुक निर्णय घ्यावेत हा सल्ला देणारे आपण कोण?अडगळीत पडलेले सपकाळ अचानक राजकारणात येवून फालतू बडबड करीत आहात. नैराश्यापोटी तुमचा राऊत झाला आहे.आम्ही चाळीस वर्ष काँग्रेस पक्षात होतो.पक्षाकडून उपेक्षाच झाली. अजितदादा पवार कदर करणारा ,न्याय देणारा नेता होता.दादांच्या पत्नी त्याच ताकदीने काम करुन स्वतःच अस्तित्व दाखवतील जरा दमाने घ्या.माफी मागा नाहीतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रक्षोभकाला सामोरे जायला तयार राहा. हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर माफी मागावी अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने तोंडाला काळे फासणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस गणपतराव फुलवडे यांनी सांगितले.

### कलासारथी कला मंचचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**वडगाव कांदळी : दैनिक संध्या**

कलासारथी कला मंच पुणे या संस्थेचा पहिला वर्धापनदिन शनिवार दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी राजाराम पाटील वृध्दाश्रम बल्लाळवाडी येथे प्रचंड उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी वर्धापनदिनाचे औचित्य साधुन स्व.एकनाथ होनराव याच्या स्मरणार्थ वृध्दांना चादरी चे व इतर साहित्यांचे वाटप करण्यात आले . वृध्दाश्रमात निराधार मातापित्यांनां गोड भोजन देण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाला अर्बन सहकारी बँकेचे अधिकारी सतिश जाधव, कमलेश थोरात सावली फाऊंडेशन अध्यक्ष डेरिंग द बारामती फाईल , नाद एकच बैलगाडा शर्यत अभिनेते, निर्माते दिग्दर्शक आदित्य राजे मराठे, चित्रपट अभिनेत्री घोडेगाव ची कन्या ऐश्वर्या मारुती दौंड, ह.भ.प.विकास महाराज हगवणे, निळकंठ होनराव, सचिन होनराव, दीपक घोडेकर, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रकाश नेहरकर यांनी स्विकारले. मस्करे ताई यांनी अनुमोदन दिले. दीप प्रज्वलन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले .कलासारथी, कला मंच पुणे ( रजि ) संस्थेचे अध्यक्ष जयेशजी शिंदे यांनी गणेश पूजन केले .प्रास्ताविक नाट्य दिग्दर्शक रामदासजी काळे यांनी केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संतोष नेहरकर यांनी केले. कार्यआढावा शंकरजी ठोंबरे यांनी केला. सर्व पाहुण्यांचे स्वागत हेमंत काळे यांनी केले.समारोप आभार कांताताई मस्करे यांनी केले. अध्यक्ष जयेशजी शिंदे उपाध्यक्ष,कांताताई मस्करे ,संस्थापक रामदास काळे, कोषाध्यक्ष शंकर ठोंबरे,सहकोषाध्यक्ष हेमंत काळे,प्रमुख सल्लागार प्रकाश नेहरकर, कार्यकारिणी सदस्य संतोष नेहरकर इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

### व्ही. जे. इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'गणेश आयडॉल मेकिंग' उपक्रम उत्साहात संपन्न

**वडगाव कांदळी : दैनिक संध्या**

वडगाव कांदळी :- विशाल जुन्नर सेवा मंडळ संचलित व्ही. जे. इंटरनॅशनल स्कूल, नगदवाडी, कांदळी येथे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्या सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी 'इको-फ्रेंडली गणेश आयडॉल मेकिंग' या उपक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. गणेशोत्सवाचे सांस्कृतिक महत्त्व आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाडू मातीचा वापर करून आकर्षक, पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्वतःच्या कल्पकतेने साकारल्या. प्रत्येक विद्यार्थ्याने अत्यंत उत्साहाने, कलात्मकतेने आणि बारकाईने मूर्ती तयार करत आपले कौशल्य सादर केले. प्लास्टर ऑफ पॅरिसपासून तयार होणाऱ्या आणि पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या गणेशमूर्तींना पर्याय म्हणून विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून सहज विघटन होणाऱ्या, पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करून निसर्गसंवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. "बाप्पाची भक्ती आणि पर्यावरणाची जपणूक" हा सुंदर विचार कृतीतून साकारत विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची प्रेरणादायी दिशा समाजासमोर मांडली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध आकारांच्या, आकर्षक आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्तींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, पर्यावरणप्रेम, स्वावलंबन, भारतीय संस्कृतीबद्दल आदर आणि सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली. हा उपक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री तांगतोडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी शाळेच्या समन्वयिका जयश्री कुंजीर, श्वेता कोकणे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले.

# राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेत ज्ञानवर्धिनी विद्यालयाचा द्वितीय क्रमांक

**■ चाकण (दै. संध्या)**

चाकण बालरंगभूमी आयोजित इतिहास महाराष्ट्राचा या अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन चरित्रावर आधारित राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेत स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अहिल्याबाईंचा वज्रनिर्धार या नाटकाने उत्कृष्ट अभिनय व प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. या नाटकात स्वरा रांधवन, तनिष्का दिघे, समीक्षा वडोदे, रेवा वाबळे, स्वरा रेपाळे, प्रणित गिरासे, अथर्व जाधव आणि आराध्या हेगडे यांनी चांगल्या भूमिका साकारल्या. अहिल्यानगर येथे बालरंगभूमीच्या अध्यक्षा निलम शिर्के व दिपाली शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.

नाटकाचे लेखन उर्मिला कोबल यांनी, तर दिग्दर्शन अर्चना माळी यांनी केले. विद्यार्थ्यांना विजयकुमार तांबे, नारायण करपे, मनोहर शेवकरी, प्राचार्या प्रमिला गोरे आदींचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, नगराध्यक्षा मनिषा गोरे, प्रदूषण नियंत्रण मंडळ सदस्य नितीन गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, माणिक गोरे तसेच संचालक अंकुश पवार, विष्णू गोरे, निलेश संभूस, ओंकार गोरे, ज्ञानेश्वर सातव, माधुरी गोरे, सचिन आभाळे व सविता कुमकर आदींनी सर्व विद्यार्थी कलाकार व शिक्षकांचे कौतुक केले.




## विमानतळ पिटाळून लावल्यानंतर आता रेल्वे प्रकल्पाबरोबर वाहतूक कोंडी सोडविण्याकडे लक्ष द्या



**■ चाकण (दै. संध्या)**

बहुचर्चित विमानतळ पिटाळून लावल्यानंतर आता रेल्वे प्रकल्पाबरोबर वाहतूक कोंडी सोडविण्याकडे लक्ष द्या, असे साकडे भापसे पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक ताटे यांनी प्रशासनाला घातले आहे.

उद्योग व्यवसायाला चालना मिळण्यासाठी रेल्वे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. हा प्रकल्प झाल्यास गरजूंना नोकऱ्या मिळू शकतील. त्यामुळे रेल्वे प्रकल्प सरळ मार्गे होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. विमानतळ गेले अन मंजूर झालेला रेल्वे प्रकल्पही गेला हे धक्कादायक आहे. मात्र रेल्वे प्रकल्प आपल्याच भागात आणण्यासाठी सर्वांच्या प्रयत्नांची गरज आहे. चाकणकर नागरिक रोजच्या होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे हैराण झाले आहेत. बेशिस्त वाहन चालकांमळे चाकण मधील परिस्थिती अत्यंत गंभीर होत चालली असून, नागरिक मरणयातना सहन करत आहेत. विमानतळ गेले, मंजूर झालेला रेल्वे प्रकल्पही बारगळला. त्यामुळे चाकण भागात विकास कामांचा बट्ट्याबोळ झाला आहे. चाकण परिसरातील पायाभूत सुविधा आणि वाहतूक नियोजन अत्यंत तोकडे पडत आहे. चाकण मध्ये रस्त्याच्या दुतर्फा असलेली अनधिकृत दुकाने व टपऱ्यांमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. नियोजनशून्य पार्किंग बनले आहे. अवजड वाहने, ट्रक, कंटेनर रस्त्याच्या कडेलाच उभी केली जात असल्याने शहरात वाहतुकीला अडथळा होत आहे. भाजी विक्रेते अगदी रस्त्याला खेटून भाजी विक्रीसाठी बसतात. विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांची संख्या भरमसाठ असून सिग्नल यंत्रणेचा अभाव आहे.

## कृतियुक्त शिक्षणातून विद्यार्थी घेताहेत आनंदाची अनुभूती

**■ चाकण (दै. संध्या)**

एस.पी. देशमुख शिक्षण संस्थेच्या येथील विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूलमध्ये कृतीयुक्त शिक्षणातून विद्यार्थी आनंदाची अनुभूती घेत आहेत.

विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणासोबत कृतियुक्त, अनुभवाधारित व आनंददायी शिक्षणाची संधी मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे संस्थेचे अध्यक्ष शामराव देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रोहिणी देशमुख व प्राचार्या स्वाती रणदिवे आणि मोनाली नलावडे यांनी सांगितले. विविध नाविन्यपूर्ण व कौशल्याधारित उपक्रम यावेळी घेण्यात आले. वर्तमानपत्रापासून फुलपाखरू तयार करणे व टिश्यू पेंटिंग करणे, पॉप कॅप तयार करणे व मातीपासून गणपती बनविणे, स्टोरी बॉक्स तयार करणे, कथाकथन, राखी तयार करणे व अग्निविरहित पाककला तयार करण्यात आली. राखी तयार करणे व लोकरीपासून सजावटीच्या वस्तू तयार करणे, मेजरमेंट रॅली तसेच पॉट रंगवणे व सजावट करण्यात आली. जितेंद्र वडगांवकर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना ऑटोमोबाईल क्षेत्राविषयी मार्गदर्शन केले. पाईप क्लीनरपासून आकर्षक सजावटीची फुले तयार करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. सुतळीच्या साहाय्याने सजावटीचे



वॉल हँगिंग व कॅन्डल मेकिंग करण्यात आले. कापड व कागदापासून पर्यावरण पूरक पिशव्या तयार करण्यात आल्या.

सर्जनशीलता, कल्पकता, निरीक्षण शक्ती, समस्या सोडविण्याची क्षमता, सहकार्याची भावना आणि स्वावलंबन यांसारखी कौशल्ये विकसित करण्यात आली.

रोहिणी देशमुख यांनी सांगितले की, शिकताना आनंद आणि आनंदातून शिक्षण या संकल्पनेला साकार करणारा हा बेगलेस डे सर्व विद्यार्थ्यांसाठी निश्चितच अविस्मरणीय ठरणारा आहे.

## कृषिरत्न अनिलतात्या मेहेर यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

**■ नारायणगाव(दै. संध्या)**

ग्रामीण भागातील शिक्षण व कृषी क्षेत्रामध्ये केलेल्या भरीव कार्याबद्दल नारायणगाव येथील ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिलतात्या मेहेर यांना संस्थाचालक शिक्षण मंडळ पुणे जिल्हा व अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थाचालक शिक्षण मंडळ पुणे जिल्हयाचे अध्यक्ष विजय कोलते व पुणे जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर यांच्या शुभ हस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अखिल भारतीय शिक्षण परिषदेचे शाहू कॉलेज, पर्वती पायथा, पुणे येथे आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एस. एस. सी. परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांनाही गौरविण्यात



आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संग्राम कोंडे यांनी केले.

यामध्ये त्यांनी संस्थाचालक शिक्षण मंडळ कामकाजाबाबत माहिती दिली.पुणे जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी मा. भाऊसाहेब कारेकर यांनी शिक्षण क्षेत्रातील आव्हाने व शासनाची भूमिका स्पष्ट केली.

## दुभाजकातील गवत अन् कचऱ्याची लावली विल्हेवाट

**■ चाकण (दै. संध्या)**

गेल्या अनेक दिवसांपासून महामार्गावरील दुभाजकात अडकलेल्या कचऱ्याची अन् गवताची नगरपरिषद प्रशासनाच्या माध्यमातून विल्हेवाट लावण्यात आली.

चाकण येथील मार्केटयार्ड ते जय भारत चौक कमान या दरम्यान रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकांमध्ये मुसळधार पावसामुळे झाडांच्या फांद्या व गवत मोठ्या प्रमाणावर वाढले होते. या वाढलेल्या गवतामुळे समोरील भाग दिसत नव्हता. तसेच फांद्या अस्ताव्यस्त वाढल्याने दुभाजकाच्या दोन्ही बाजूंचा रस्ता व समोरील वाहने दिसणे कठीण झाले होते. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व गटनेते नितीन गोरे यांच्या नेतृत्वाखाली महिला व बालकल्याण



समितीच्या सभापती तथा नगरसेविका रूपाली कांडगे व उद्योजक राहुल कांडगे यांनी नगरपरिषदेकडे यासाठी पाठपुरावा सुरू केला.

चाकण नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाला तात्काळ याबाबत सूचित करण्यात आले. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने स्वच्छता मोहीम राबवून रस्त्यालगतच्या धोकादायक फांद्यांची छाटणी केली. गवत काढून परिसर स्वच्छ व सर्वांग सुंदर केला. अस्ताव्यस्त वाढलेल्या फांद्यांची व गवताची तातडीने छाटणी केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. रस्त्यावरील दृश्यमानता सुधारून अपघाताचा संभाव्य धोका टळला आहे. नागरिक व वाहनधारक यांची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वेळेत काम पूर्ण करून रस्ता सुरक्षित केला आहे. नोकरदाराची ही तत्परता खरोखरच वाखाणण्याजोगी आहे.

# चाकणला हिरवी मिरची व कांद्याची विक्रमी आवक

**■ चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये भेंडी, दोडका, रताळे, आले आदींची प्रचंड आवक झाली. पालेभाज्यांच्या बाजारात कोथिंबीर, मेथी व पालक भाजीचे भाव कोसळले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ९० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार २५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,००० ते २,६५० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,६०० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,५०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ६५ क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १६ हजार रुपयांवर पोहोचला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३७० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला २ हजार रुपयांपासून ते ३ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

कांदा - एकूण आवक - १,२५० क्विंटल. भाव क्रमांक - १.२,६५० रुपये, भाव क्रमांक २. २,००० रुपये, भाव क्रमांक ३. १,००० रू. बटाटा - एकूण आवक - १,६०० क्विंटल.भाव क्रमांक १.१,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.

फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ३२९ क्विंटल (१,००० ते २,००० रू.), कोबी - १९० क्विंटल (१,००० ते १,८०० रू.), फ्लॉवर - २१० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), वांगी - ८२ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), भेंडी - ८५ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), दोडका - ६९ क्विंटल (२,००० ते ४,५०० रु.), कारली - ७३ क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.), दुधीभोपळा - ७० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ९५ क्विंटल (८०० ते २,२०० रु.), फरशी - १४ क्विंटल (५,००० ते ७,००० रु.), वालवड - ६२ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रुपये), ढोबळी मिरची - ५३ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), चवळी - ४२ क्विंटल (२,५०० ते ४,५०० रु.), शेवगा - ५३ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), गाजर - १८५ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ५८ क्विंटल (४,००० ते ७,००० रु. ), आले - १७५ क्विंटल (७,००० ते १२,००० रु. ),.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# थोडक्यात पण महत्वाचे

## सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी मंजुरी

कोल्हापूर : छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुलामध्ये अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विभागीय क्रीडा संकुल समितीने शासनाकडे सादर केलेल्या १९५ कोटी रुपयांच्या आराखड्यास लवकरच मंजुरी देण्यात येईल, अशी ग्वाही क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली. विभागीय क्रीडा संकुलामध्ये अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विभागीय क्रीडा संकुल समितीने शासनाकडे सादर केलेल्या आराखड्याबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी माहिती घेतली. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि कोल्हापूर क्रीडा विभागाचे उपसंचालक सुहास पाटील उपस्थित होते. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विभागीय क्रीडा संकुल समितीने शासनाकडे सादर केलेल्या १९५ कोटी रुपयांच्या आराखड्याची माहिती घेतली. कोल्हापूरच्या खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात दैदीप्यमान कामगिरी केली असून, त्यांना अद्ययावत सुविधांची अत्यंत गरज आहे. त्यामुळे हा आराखडा मंजूर करण्यासाठी राज्य क्रीडा विकास समितीमार्फत प्रस्तावाच्या मंजुरीची कार्यवाही लवकरच करण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## त्याग व योगदान प्रेरणादायी

यवतमाळ : यवतमाळ ही संघर्ष आणि स्वाभिमानाची परंपरा लाभलेली भूमी आहे. या भूमीनेही स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिले असून जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांचा त्याग आणि योगदान सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी आज, रविवारी केले. ते बाभूळगाव तालुक्यातील उमरी (शहीद) येथील हुतात्मा स्मारक येथे आयोजित क्रांती दिन कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सर्व शहीद क्रांतिवीरांना मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाला शहीद पत्नी संगीता घोटेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, नगराध्यक्ष संगीता मालखुरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज मेहेत्रे, कार्यकारी अभियंता माधव उघडे, तहसीलदार मीरा पागोरे, गटविकास अधिकारी ढोले, पोलीस निरीक्षक भेंडे, उपअभियंता दीपक निचळ, कनिष्ठ अभियंता कीर्ती रामेकर, स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांच्या परिवारातील सदस्य विजय माळवी, सुरेश माळवी, सत्यदेव पाळेकर, कैलास सुलबेवार, सतीश कोटमवार, अतुल देशपांडे, कौशल्या रामटेके, नंदू बुटे, हरिभाऊ चव्हाण, शेख हसन शेख चांद, नीरज राऊत, सरपंच सोनाली शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांनी स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्मा यशवंत लुडबाजी पाळेकर, शहीद मधुकर घोटेकर यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक आणि वीरांना अभिवादन केले. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की, आजचा दिवस देशभक्ती आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा देणारा दिवस आहे.

## रिंग फसली, आयुक्तांनी रद्द केला ७५ कोटींची निविदा

पुणे : शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याच्या ७५ कोटी रुपयांच्या निविदेत ठरावीक ठेकेदारांना पात्र ठरविण्याचा खटाटोप सुरू असल्याने प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांवर आरोप सुरू झाले होते. आयुक्तांनी केलेल्या छाननीमध्ये अटीशर्तीमुळे निर्माण झालेला संभ्रम आणि त्यामुळे न झालेल्या पुरेशा स्पर्धेमुळे आयुक्त नवल किशोर राम यांनी ही निविदा थेट रद्द करून तथाकथित एजंटांना जोरदार झटका दिला आहे. आयुक्तांनी आता तीन ऐवजी प्रत्येकी १० कोटींच्या सात निविदा काढून रस्ते दुरुस्ती केली जाणार आहे. पथ विभागाने काढलेल्या निविदेत अपात्र ठेकेदारांना पात्र ठरवून कोट्यावधी रुपयांची कामे दिली जाणार असल्याचे वृत्त दिले होते. त्याची गंभीर दखल आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतली होती. पुणे शहरात गेल्या वर्षभरात विविध सेवावाहिन्या टाकण्यासाठी सुमारे ७० किलोमीटर रस्ते खोदाईची परवानगी दिलेली होती. तसेच महापालिकेच्या विविध विभागांतर्फे सुमारे १५ किलोमीटरचे रस्ते खोदले आहेत. या रस्त्यांचे रिइस्टेटमेंट करण्यासाठी पथ विभागाने प्रत्येकी २५ कोटी रुपयांच्या तीन निविदा काढल्या होत्या. या निविदेच्या अटीशर्तीमध्ये हॉटमिक्स प्लांटांची क्षमता कमीत कमी १२० टन प्रतितास असणे आवश्यक असताना एका ठेकेदाराचा प्लांट हा ८० टन ते १२० टन प्रतितास या क्षमतेचा होता. तरीही त्यास पात्र केले होते. अन्य ठेकेदारांची क्षमता तपासल्यानंतर हा 'लाडका' ठेकेदार अपात्र ठरत असल्याचे स्पष्ट झाले.

# आदिवासी विद्यार्थ्यांची जंगलाच्या कुशीतून आकाशाकडे झेप



### संस्कृतीची मुळे जपत आधुनिकतेच्या दिशेने...

गडचिरोलीच्या आदिवासी समाजाची स्वतंत्र जीवनपद्धती, भाषा, लोककला, परंपरा, सामूहिक जीवनमूल्ये आणि निसर्गाशी असलेले अतूट नाते ही जिल्ह्याची अमूल्य संपदा आहे. आधुनिक विकास म्हणजे हा वारसा मागे सोडणे नव्हे. आपल्या संस्कृतीची मुळे अधिक घट्ट पकडून आधुनिक शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नव्या संधींचे आकाश पुढील आदिवासी पिढीसाठी खुले करणे, हा विकासाचा अधिक व्यापक अर्थ आहे. जागतिक आदिवासी दिन हा आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, संस्कृतीचा आणि समृद्ध परंपरांचा गौरव करण्याचा दिवस आहे; त्याचवेळी आदिवासी समाजाच्या नव्या पिढीच्या शिक्षणाचा, आकांक्षांचा आणि भविष्याचा विचार करण्याचाही हा दिवस आहे.

आज गडचिरोलीतील आदिवासी विद्यार्थी आपल्या गावाच्या सीमा ओलांडून देशाच्या सर्वोच्च संस्थांपर्यंत पोहोचत आहेत. राष्ट्रपतींशी संवाद साधत आहेत. संसद भवनात देशाची लोकशाही समजून घेत आहेत. आयआयटी आणि विज्ञान केंद्रांमध्ये उद्याच्या संधी शोधत आहेत.मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि विविध शासकीय विभागांच्या प्रयत्नांतून गडचिरोलीतील आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण आणि अनुभवाची नवी क्षितिजे खुली होत आहेत. गडचिरोली भौगोलिकदृष्ट्या दुर्गम असू शकतो; पण येथील आदिवासी मुलांची स्वप्ने आता दुर्गम राहिलेली नाहीत. जंगलाच्या कुशीतल्या शाळेतून सुरू झालेला त्यांचा प्रवास राष्ट्रपती भवन, संसद, आयआयटी, इस्रो आणि विज्ञान केंद्रांपर्यंत पोहोचला आहे.

### जागतिक आदिवासी दिन विशेष...

■ मुंबई (दै. संध्या)

ज्या आदिवासी मुला-मुलींसाठी कधीकाळी जिल्ह्याचे ठिकाण गाठणेही मोठी गोष्ट होती, त्याच दुर्गम आदिवासी भागातील नवी पिढी आज विमानाने दिल्ली-मुंबई, हैदराबाद आणि बंगलोर गाठत आहे. देशाच्या राष्ट्रपतींशी संवाद साधत आहे, संसद भवन पाहत आहे, आयआयटी, इस्रो आणि विज्ञान केंद्रांना भेट देत आहे, मंत्रालय-विधानभवनाची कार्यपद्धती समजून घेत आहे. आपल्या गावाच्या, जंगलाच्या आणि परिचित परिसराच्या पलीकडे संधींचे किती विशाल विश्व आहे, हे ती प्रत्यक्ष अनुभवत आहे.

गडचिरोलीच्या दुर्गम आदिवासी भागातील एका विद्यार्थ्याने राष्ट्रपती भवनात भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्यासमोर आत्मविश्वासाने उभे राहून, "मला शिक्षक व्हायचे आहे," असे सांगणे हा या परिवर्तनाचा बोलका क्षण आहे. त्यावर राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि शिक्षण, मेहनत व चिकाटीच्या बळावर ती पूर्ण करण्याचा प्रेरणादायी संदेश दिला.

ही केवळ एका आदिवासी विद्यार्थ्याची गोष्ट नाही. ही आदिवासीबहुल गडचिरोलीच्या नव्या पिढीच्या बदलत्या आकांक्षांची गोष्ट आहे. आपल्या समृद्ध संस्कृतीची मुळे जपत शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिक संधींच्या दिशेने आत्मविश्वासाने पुढे जाणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या नव्या प्रवासाची ही सुरुवात आहे.

महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर वसलेला गडचिरोली हा आदिवासीबहुल, वनव्याप्त आणि प्रामुख्याने ग्रामीण जिल्हा. घनदाट जंगले, नद्या-नाले, विपुल वनसंपदा आणि समृद्ध आदिवासी संस्कृती ही या जिल्ह्याची ओळख आहे. मात्र, भौगोलिक दुर्गमतेमुळे अनेक गावांतील नागरिकांचा मोठ्या शहरांशी प्रत्यक्ष संपर्क मर्यादित राहिला आहे. आजही दुर्गम भागातील अनेक नागरिकांनी जिल्हा मुख्यालय पाहिलेले नाही; नागपूर, मुंबई किंवा दिल्लीसारख्या महानगरांचा प्रत्यक्ष अनुभव तर अनेकांसाठी दूरची बाब आहे.

या भौगोलिक अंतरामुळे आदिवासी मुलांच्या गुणवत्तेला किंवा क्षमतेला मर्यादा नसल्या, तरी त्यांच्या अनुभवविश्वाला मर्यादा येऊ शकतात. हीच दरी कमी करण्यासाठी शासन आणि जिल्हा प्रशासनाकडून शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गडचिरोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाबरोबरच दुर्गम व आदिवासी भागातील नव्या पिढीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक ज्ञान आणि व्यापक अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात आहे. या व्यापक प्रयत्नांचाच एक भाग म्हणून विविध विभागांच्या माध्यमातून आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विमानाने देशातील महानगरांमध्ये शैक्षणिक अभ्यास दौऱ्यांची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

उद्देश केवळ मोठी शहरे दाखविण्याचा नाही; तर देशातील आधुनिक पायाभूत सुविधा, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती, उच्च शिक्षणाच्या संधी, लोकशाही व प्रशासकीय व्यवस्था आणि ऐतिहासिक-सांस्कृतिक वारसा प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी देऊन येथील विद्यार्थ्यांच्या आकांक्षांना नवे क्षितिज देण्याचा आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मागील तीन वर्षात गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या एकूण ३६० विद्यार्थ्यांना विमानाने हैदराबाद, बंगळुरू व यावर्षी दिल्लीच्या शैक्षणिक अभ्यास दौऱ्याची संधी दिली.

यातील अनेक विद्यार्थ्यांसाठी विमानप्रवासाचा हा पहिलाच अनुभव होता. नागपूर विमानतळावरून दिल्लीकडे विमानाने झेपावताना त्यांच्या चेहऱ्यावरील कुतूहल आणि आनंद त्यांच्या अनुभवविश्वात घडत असलेल्या बदलाची साक्ष देत होता. दिल्लीमध्ये राष्ट्रपती भवन, संसद भवन आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या विविध स्थळांना भेट देऊन विद्यार्थ्यांनी देशाची लोकशाही व्यवस्था, इतिहास, संस्कृती आणि विकासाचे विविध आयाम समजून घेतले. आदिवासी विकास विभागाने जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेतून गडचिरोली, अहेरी आणि भामरागड येथील शासकीय आश्रमशाळांमधील 96 आदिवासी विद्यार्थ्यांसाठी दिल्ली शैक्षणिक अभ्यास दौरा आयोजित केला. या दौऱ्याचा सर्वाधिक प्रेरणादायी क्षण ठरला तो राष्ट्रपती भवनातील भेटीचा. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी गडचिरोलीच्या आदिवासी विद्यार्थ्यांचे आत्मीयतेने स्वागत केले. त्यांनी विद्यार्थ्यांची नावे, गावे, शिक्षण आणि भविष्यातील ध्येय जाणून घेतले. पोटेगाव येथील एका विद्यार्थ्याने शिक्षक होण्याची इच्छा व्यक्त केली. त्याच्या स्वप्नाचे कौतुक करत राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेश दिला. देशाच्या एका दुर्गम आदिवासी गावातून आलेला विद्यार्थी राष्ट्रपती भवनात देशाच्या प्रथम नागरिकांसमोर उभा राहून आत्मविश्वासाने आपल्या भविष्याचे स्वप्न सांगतो. हा बदलत्या गडचिरोलीचा आणि नव्या आकांक्षांनी भरलेल्या आदिवासी पिढीचा अत्यंत आश्वासक क्षण आहे. या विद्यार्थ्यांनी संसद भवन, पंतप्रधान संग्रहालय, राष्ट्रीय विज्ञान केंद्र, आयआयटी दिल्ली, जंतरमंतर, राजघाट, लाल किल्ला, कुतुबमिनार आणि राष्ट्रीय प्राणीसंग्रहालयालाही भेट दिली. लोकशाहीपासून विज्ञानापर्यंत आणि इतिहासापासून उच्च शिक्षणापर्यंत देशाच्या विविध क्षेत्रांची ओळख त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून झाली.

जिल्हा परिषद गडचिरोलीने ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी 'मिशन जिकतूर' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीतील जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांना विमानाने मुंबईच्या शैक्षणिक अभ्यास दौऱ्यावर नेण्यात आले.

दौऱ्यात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव तथा गडचिरोलीचे पालक सचिव राजेश अग्रवाल यांच्याशी संवाद साधून शिक्षक, डॉक्टर, कलेक्टर आणि पोलीस अधिकारी होण्याची स्वप्ने मांडली. तसेच मंत्रालय, विधानभवन, गेटवे ऑफ इंडिया, नेहरू विज्ञान केंद्र, तारांगणासह विविध ऐतिहासिक व शैक्षणिक स्थळांना भेट दिली.

'मिशन जिकतूर'अंतर्गत शिष्यवृत्ती व नवोदय प्रवेश परीक्षेची विशेष तयारी, तज्ज्ञ मार्गदर्शन, ओएमआर सराव आणि शिक्षकांचे उद्बोधन याद्वारे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला संधी आणि त्यांच्या आकांक्षांना नवी दिशा दिली जात आहे. या उपक्रमांचे मूल्यमापन केवळ किती विद्यार्थ्यांनी विमानप्रवास केला किंवा किती स्थळांना भेट दिली एवढ्यावर करता येणार नाही. त्यांचा खरा परिणाम आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या विचारविश्वात व आकांक्षांमध्ये शोधावा लागेल. एखाद्या मुलाला 'वैज्ञानिक हो' असे सांगणे आणि त्याला प्रत्यक्ष विज्ञान केंद्र किंवा संशोधन संस्था दाखविणे यात फरक आहे. 'मोठा अधिकारी हो' असे सांगण्यापेक्षा संसद भवन, राष्ट्रपती भवन, मंत्रालय किंवा विधानभवनाची व्यवस्था प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी देणे अधिक परिणामकारक आहे. आयआयटीचे नाव पुस्तकात वाचण्यापेक्षा त्या संस्थेच्या परिसरात उभे राहिल्यावर 'मीसुद्धा एक दिवस येथे शिकू शकतो' हा विचार मनात निर्माण होणे अधिक महत्त्वाचे आहे.

विकास म्हणजे केवळ रस्ते, पूल, वीज आणि इमारती नव्हेत. विकास म्हणजे संधींची दारे खुली होणे, स्वतःच्या क्षमतेची जाणीव निर्माण होणे आणि 'मीसुद्धा हे करू शकतो' हा आत्मविश्वास आदिवासी समाजाच्या नव्या पिढीच्या मनात रुजणे.

## मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याकडून चंद्रभागा घाट व श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसराची पाहणी

■ पंढरपूर(दै. संध्या)

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज पंढरपूर दौऱ्यादरम्यान चंद्रभागा नदी घाट तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसराची पाहणी केली. यावेळी प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी त्यांचे स्वागत केले.

मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी प्रथम चंद्रभागा घाट परिसराची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी नदीपात्र स्वच्छता, भाविकांसाठी स्नान सुविधा, प्रकाश व्यवस्था तसेच घाटावरील सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. आषाढी-कार्तिकी वारीतील भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याच्या उपाययोजनाबाबत सूचना दिल्या. तसेच यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देऊन भाविक, वारकऱ्यांना प्रशासनाच्या वतीने कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही अशा पद्धतीने सुविधा उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर श्री. अग्रवाल यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसराची पाहणी केली. यावेळी तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत 73 कोटीच्या निधीतून झालेल्या मंदिर विकास, सुशोभिकरण कामांची पाहणी ही त्यांनी केली. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी प्रस्तावित श्री क्षेत्र पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पाबाबत माहिती दिली. यामध्ये मंदिर परिसरातील भाविकांसाठी सुलभ दर्शन मार्ग, प्रशस्त प्रदक्षिणा मार्ग व अत्याधुनिक सुविधा तसेच भक्त निवास, बहुमजली पार्किंग, प्रसादालय, माहिती केंद्र, वैद्यकीय मदत कक्ष, वृद्ध व दिव्यांगांसाठी विशेष मार्ग. सुरक्षा व नियोजन: गर्दी व्यवस्थापनासाठी स्वतंत्र प्रवेश-निर्गम मार्ग, सीसीटीव्ही व अग्निशमन यंत्रणा. आदी विषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

## लवकरच राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज

■ का गल(दै. संध्या)

शेतकऱ्यांना दिलेले वचन पूर्ण करत राज्य शासनाने आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी दिली असून, यापुढे प्रत्येक शेतकऱ्याला थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी सौर कृषी वाहिनी योजनेला गती देण्यात आली असून, सध्या ७४ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. यावर्षाअखेर ९० टक्के आणि पुढील वर्षी १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

कागल नगरीत विविध विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी आयोजित शेतकरी मेळाव्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी कागल नगरपरिषदेच्या वतीने हिंदूराव घाटगे विद्यालयाच्या जीर्णोद्धार कामाचा लोकार्पण सोहळा तसेच लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार होत्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्रांतीच्या माध्यमातून बहुजन समाजासाठी शिक्षण आणि रोजगाराची दारे खुली केली. १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाच्या क्रांतिकारी पर्वाच्या स्मरणदिनी अशा थोर समाजसुधारकाच्या पुतळ्याचे अनावरण करण्याचे भाग्य मिळणे ही आपल्यासाठी विशेष बाब आहे. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या काळातील चुकीची सामाजिक व्यवस्था झुगारून नवी सामाजिक व्यवस्था निर्माण केली. त्यांनी आरक्षणाचा क्रांतिकारी निर्णय घेतला, मोफत शिक्षण सुरू केले, वंचितांसाठी विविध आनुषंगिक योजना राबवल्या आणि अस्पृश्यतेला गुन्हा मानून त्यावर बंदी घातली, असे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला वारसा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान आणि राजर्षी शाहू महाराजांनी दिलेले विचार या त्रिसूत्रीच्या आधारावर राज्य शासन काम करीत आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. राधानगरी धरण हा राजर्षी शाहू महाराजांच्या दूरदृष्टीचा आणि अभियांत्रिकी कौशल्याचा अविष्कार असून, त्यांनी निर्माण केलेल्या जलसाठ्यांमुळे आजही जनतेला त्याचा लाभ होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी कर्जमाफीबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांना दिलेले वचन पूर्ण करून आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी देण्यात आली असून, ५६ हजार शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला आहे.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी शासन दरवर्षी २५ हजार कोटी रुपये खर्च करीत असून, ५८ हजार कोटी रुपयांची थकबाकीही शासनाने दिली आहे. आता प्रत्येक शेतकऱ्याला थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते रुग्णालयाच्या नूतनीकरण कामांचे लोकार्पण

■ कोल्हापूर (दै. संध्या)

पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वाचे आणि ऐतिहासिक शासकीय रुग्णालय असलेल्या छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय (सीपीआर), कोल्हापूर येथील विविध नूतनीकरण व आधुनिकीकरणाच्या कामांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत फीत कापून व कोनशिलेचे अनावरण करून करण्यात आले.

रुग्णालयाच्या ऐतिहासिक वारसास्थळाचे जतन करत रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या पुढाकारातून विविध कामे करण्यात आली असून, त्यासाठी आत्तापर्यंत ६०० कोटी रुपयांहून अधिक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मंत्री हसन मुश्रीफ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी सीपीआर रुग्णालयाच्या ऐतिहासिक वाटचालीसह नूतनीकरण व आधुनिकीकरणाच्या कामांवर आधारित लघुपट दाखविण्यात आला. तसेच रुग्णालयाची प्रतिमा मान्यवरांना भेट देण्यात आली. यावेळी राजर्षी शाहू महाराज आणि राज्याचे तत्कालीन आरोग्यमंत्री स्व. दिग्विजय खानविलकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या नूतनीकरणामध्ये रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराची कमान, मॉड्युलर बर्न आयसीयू, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, मॉड्युलर आयसीयू, एमआरआय विभाग, अत्याधुनिक निदान व उपचार सुविधा, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवारा शेड, तसेच विविध वैद्यकीय विभागांचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे सीपीआर रुग्णालयातील आरोग्यसेवांची क्षमता आणि गुणवत्ता अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. याशिवाय, रुग्णालयातील विविध इमारतींची दुरुस्ती, रस्ते व परिसर विकास, विद्युत व्यवस्था, फर्निचर, विविध विभागांचे बांधकाम व आधुनिकीकरण, ट्रॉमा केअर सेंटर, अत्याधुनिक ऑपरेशन सुविधा, तसेच विविध मॉड्युलर कामे करण्यात आली आहेत. या सुविधांमुळे कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शासकीय आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आमदार राजेश क्षीरसागर, जिल्हा परिषद अध्यक्षा शिल्पा खोत, महापौर रूपाराणी निकम, खासदार धनंजय महाडिक, खासदार शाहू महाराज छत्रपती, आमदार अमल महाडिक, आदी उपस्थित होते.



■ ऐतिहासिक वारसास्थळाचे जतन करत अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांचा विस्तार; ६०० कोटी रुपयांहून अधिक निधीतून विविध कामे

■ यावेळी सीपीआर रुग्णालयाच्या ऐतिहासिक वाटचालीसह नूतनीकरण व आधुनिकीकरणाच्या कामांवर आधारित लघुपट दाखविण्यात आला. तसेच रुग्णालयाची प्रतिमा मान्यवरांना भेट देण्यात आली.

# एम. ए. रंगूनवाला कॉलेजमध्ये डिजिटल दंतचिकित्सा आणि इम्प्लांटचे आधुनिक केंद्र सुरू

■ पुणे (दै. संध्या)

एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटरमध्ये 'अबेदा इनामदार सेंटर ऑफ इम्प्लांटोलॉजी अँड डिजिटल डेंटिस्ट्री' सुरू करण्यात आले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दंतशिक्षण आणि रुग्णांवरील उपचार अधिक चांगले करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे. या केंद्रात विद्यार्थ्यांना आधुनिक दंतचिकित्सा तंत्रज्ञान शिकण्याची आणि त्याचा प्रत्यक्ष सराव करण्याची संधी मिळणार आहे.

एमसीई सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती अबेदा इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली हे केंद्र उभारण्यात आले आहे. भविष्यात दंतचिकित्सेमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणखी वाढणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेतानाच या नवीन तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, हा केंद्राचा मुख्य उद्देश आहे. यावेळी श्रीमती अबेदा इनामदार म्हणाल्या, "व्हर्च्युअल पेशंट तंत्रज्ञानामुळे प्रत्यक्ष उपचार सुरू करण्यापूर्वीच संपूर्ण उपचाराचे नियोजन करता येते. उपचारानंतर होणारा बदलही आधी पाहता येतो. त्यामुळे उपचार अधिक सुरक्षित आणि अचूक होऊ शकतात. रुग्णांना वारंवार हॉस्पिटलमध्ये येण्याची गरजही कमी होऊ शकते. विद्यार्थ्यांना चांगले दंतशिक्षण देणे आणि समाजाला उत्तम दंतसेवा उपलब्ध करून देणे ही या केंद्राची प्रमुख उद्दिष्टे आहेत."



त्या पुढे म्हणाल्या, "पारंपरिक दंतचिकित्सा आणि वेगाने बदलणारे डिजिटल तंत्रज्ञान यांना एकत्र आणण्यासाठी हे केंद्र तयार करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना दातांच्या आजारांचे निदान, उपचारांचे नियोजन, दंत इम्प्लांट आणि कृत्रिम दात तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव येथे मिळेल. या प्रकल्पाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत डॉ. परवेज इनामदार यांनी केलेले मार्गदर्शन आणि सहकार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले."

महाविद्यालयाच्या प्राचार्या आणि प्रोस्थोडॉन्टिक्स व इम्प्लांटोलॉजी विभागाच्या प्रमुख डॉ. रामनदीप दुगल यांनी सांगितले की, अनेक वर्षांच्या नियोजनानंतर हे केंद्र उभे राहिले आहे. हे केंद्र उभारण्यासाठी प्रभारी प्राचार्य आणि कन्झर्व्हेटिव्ह डेंटिस्ट्री व एंडोडॉन्टिक्स विभागाचे प्रमुख डॉ. विवेक हेगडे आणि प्रोस्थोडॉन्टिक्स विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. स्मिता मुसानी यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. मोहित खेर यांच्या नेतृत्वाखाली या केंद्रात डिजिटल दंतचिकित्सा आणि इम्प्लांट क्षेत्रातील शिक्षण, उपचार आणि संशोधन केले जाणार आहे. केंद्रात विद्यार्थ्यांना डिजिटल पद्धतीने उपचारांचे नियोजन, इम्प्लांट उपचार, डिजिटल स्माइल डिझाइन आणि आधुनिक दंत प्रयोगशाळेतील तंत्रांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

येथे तोंडाच्या आतील भागाचे स्कॅनिंग करणारे स्कॅनर, ३डी फेस स्कॅनर, सीबीसीटी, कॅड/कॅम यंत्रणा आणि डिजिटल डिझाइन सॉफ्टवेअर यांसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. या तंत्रज्ञानामुळे रुग्णाच्या दातांची तपासणी करण्यापासून ते उपचारांचे नियोजन आणि कृत्रिम दात तयार करण्यापर्यंत अनेक कामे डिजिटल पद्धतीने करता येतात. त्यामुळे उपचार अधिक अचूक होण्यास आणि वेळ वाचण्यास मदत होते.

केंद्रात स्वतंत्र डिजिटल डेंटिस्ट्री लॅब तयार करण्यात आली आहे. येथे पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी, इंटर्न तसेच शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.

याशिवाय ३डी प्रिंटिंग लॅबही विकसित केली जात आहे. या लॅबमध्ये उपचार आणि शस्त्रक्रियेसाठी आवश्यक विविध मॉडेल्स आणि रुग्णाच्या गरजेनुसार दंत उपकरणे तयार करता येणार आहेत. इम्प्लांट उपचारांसाठी सीबीसीटी स्कॅनिंग आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा एकत्रित वापर केला जाणार आहे. त्यामुळे इम्प्लांट नेमका कुठे आणि कसा बसवायचा, याचे आधीच अचूक नियोजन करता येईल. कठीण उपचारांच्या वेळी रुग्णांना अधिक आराम आणि सुरक्षितता मिळावी यासाठी विशेष सुविधाही उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या केंद्रामुळे एम. ए. रंगूनवाला कॉलेजने आधुनिक डिजिटल दंतशिक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन भविष्यात अधिक कुशल दंतवैद्य तयार करणे, तसेच रुग्णांना अधिक सुरक्षित आणि अचूक उपचार देणे हा या केंद्राचा उद्देश आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### रूपालीताई कांडगे यांनी राबविला स्तुत्य उपक्रम

चाकण : दैनिक संध्या

चाकण नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती तथा नगरसेविका रुपालीताई राहुलदादा कांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त एक अत्यंत स्तुत्य आणि सामाजिक बांधिलकी जपणारा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या सर्व नागरिक, कार्यकर्ते व स्नेह्यांनी केक, बुके, फुले किंवा शाल न आणता त्याऐवजी शैक्षणिक पुस्तके, वह्या व शालेय साहित्य आणले होते. या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या प्रत्येक नागरिकाला आणि कार्यकर्त्याला सभापती रुपालीताई कांडगे यांच्या हस्ते तुळशीचे रोप भेट देण्यात आले. या माध्यमातून त्यांनी पर्यावरण संवर्धन व शिक्षण प्रसार असा दुहेरी संदेश समाजाला दिला. वाढदिवसाच्या निमित्ताने होणाऱ्या निरर्थक खर्चाला फाटा देऊन समाजातील गरजू व वंचित विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे आणि घरोघरी पर्यावरणाचे रक्षण करणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला. वाढदिवसाच्या दिवशी जमा झालेले सर्व शैक्षणिक साहित्य परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. रूपालीताई कांडगे यांनी सांगितले की, वाढदिवसाचा आनंद साजरा करताना जर एखाद्या गरजू विद्यार्थ्याच्या शिक्षणाला मदत झाली व पर्यावरण रक्षणाचा संदेश घरोघरी पोहोचला तर तो माझ्यासाठी सर्वात मोठा आनंद आहे. शुभेच्छा देणाऱ्या प्रत्येकाला तुळशीचे रोप भेट देऊन या हरित आणि शैक्षणिक चळवळीत सहभागी करून घेण्याचा हा छोटासा प्रयत्न होता.

### मराठी भाषा विभागासह सात संकेतस्थळांचे शासनाच्या डोमेनवर हस्तांतरण पूर्ण

पुणे : दैनिक संध्या

मराठी भाषा विभाग तसेच विभागाच्या अधिनस्त कार्यालयांच्या सातही संकेतस्थळांचे महाराष्ट्र शासनाच्या मानक maharashtra.gov.in डोमेनवर यशस्वीपणे हस्तांतरण पूर्ण झाले असून सर्व संकेतस्थळे आता नव्या पत्त्यांवर नियमितपणे कार्यान्वित झाली आहेत. मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, विश्वकोश प्रथमावृत्ती (१ ते २० खंड) तसेच मराठी परिभाषा कोश या संकेतस्थळांचे महाआयटी (MahaIT) मार्फत हस्तांतरण करण्यात आले. हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान आवश्यक तांत्रिक व प्रणालीगत बदल करण्यात आल्यामुळे संबंधित संकेतस्थळे काही काळ तात्पुरती अनुपलब्ध होती. मात्र, आता ही प्रक्रिया पूर्ण झाल्याने सर्व संकेतस्थळे नव्या डोमेनवर सुरू करण्यात आली आहेत.

### महिलेला वारंवार फोन करून एकटी भेटण्याचा आग्रह; पाठलाग केल्याचा आरोप

उरुळी कांचन : दैनिक संध्या

■ ३ लाख १४ हजार रुपयांच्या कर्जापोटी तब्बल १० लाख ८४ हजार रुपये व्याजापोटी घेतल्याची तक्रार

उरुळी कांचन (ता. हवेली) परिसरात एका ३५ वर्षीय महिलेचा विनयभंग केल्यासह बेकायदेशीरपणे सावकारी केल्याप्रकरणी प्रमोद उर्फ परमेश्वर मोहन मारकड याच्याविरुद्ध उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार ८ फेब्रुवारी २०२५ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत वेळोवेळी घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी प्रमोद उर्फ परमेश्वर मोहन मारकड हा तिला वारंवार फोन करून तिच्या वैयक्तिक हालचालींबाबत विचारणा करत होता. तसेच, पतीसोबत का फिरते, एकटी का फिरत नाही, अशा प्रकारची वक्तव्ये करून तिला एकटी भेटण्याचा आग्रह करत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच, "तू मला एकटी भेट, तुला लागतील तर अजून पैसे देतो," असे म्हणत आरोपी महिलेला एकटी भेटण्यासाठी बोलवत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. याशिवाय आरोपी सतत आपला पाठलाग करत असल्याचा आरोपही महिलेने केला आहे. या प्रकरणातील दुसरा गंभीर आरोप बेकायदेशीर सावकारीचा आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपीकडून तिने ३ लाख १४ हजार रुपये घेतले होते. मात्र, त्यापोटी आरोपीने व्याजाच्या नावाखाली तिच्याकडून तब्बल १० लाख ८४ हजार रुपये घेतल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी महिलेने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक १९९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ७८(१), ७९ तसेच महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम ३९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाचा पुढील तपास उरुळी कांचन पोलीस करीत आहेत.

## सह्याद्री स्पोर्ट अँड फिटनेसच्या खेळाडूंचे वेटलिफ्टिंगमध्ये नेत्रदीपक यश

■ लोणी काळभोर (दै. संध्या)

जिल्हा वेटलिफ्टिंग संघटना पुणे यांच्या मान्यतेने व सार्थक वेटलिफ्टिंग सेंटर पिंपरी चिंचवड यांच्या सौजन्याने वय वर्ष ११, १४ व १७ या वयोगटाच्या भव्य जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धा संत तुकाराम नगर पिंपरी या ठिकाणी पार पडल्या. पुणे जिल्ह्यातील एकूण १०२ खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये लोणी काळभोर येथील सह्याद्री स्पोर्ट अँड फिटनेस सेंटर मधील खेळाडूंनी नेत्रदीपक यश संपादन करीत अनेक पदके प्राप्त केली. पदक प्राप्त केलेले खेळाडू पुढीलप्रमाणे, ओवी अमर गिरी सुवर्णपदक, मंजिरी अमित बोळे सुवर्णपदक, आरोही विपुल पवार सुवर्णपदक, तन्वी गणेश अंबिके सुवर्णपदक, रिजा आसिफ शेख सुवर्णपदक, शहनवाज आसिफ शेख सुवर्णपदक, अरमान दगडू शेख सुवर्णपदक, कृष्णा सागर पेटारे सुवर्णपदक, सार्थक ज्ञानदेव इंदलकर सुवर्णपदक, कार्तिकी प्रदीप शेडगे रौप्य पदक, शार्दुल योगेश उबाळे रौप्य पदक, त्रिशा सुधीर काळभोर कांस्यपदक, श्रद्धा सुनील कसबे कांस्यपदक, पटकावले .मोनिका सागर पेटारे, नंदिनी जालिंदर काळभोर, सिद्धी संतोष गावडे, आराध्या संदीप भोसले, आर्या अण्णाराव गायकवाड, साईराज दीपक भुजबळ, हिमांशू कमलेश काळभोर यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये सह्याद्री स्पोर्ट अँड फिटनेस सेंटर मधील खेळाडू रिजा आसिफ शेख हिने मुलींमध्ये बेस्ट वेटलिफ्टरचा किताब पटकावला. तसेच मुलांमध्ये सार्थक ज्ञानदेव इंदलकर याने बेस्ट वेटलिफ्टर किताब पटकाविला. या सर्व खेळाडूंना गणेश नगीने यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच या सर्व खेळाडूंचे मुख्य वित्त लेखा अधिकारी (नवी मुंबई महानगरपालिका) तुषार दौंडकर तसेच महाराष्ट्र केसरी राहुल काळभोर, सरपंच नागेश काळभोर, अभिनव चेतना मंडळाचे अध्यक्ष हेमंत हाडके, वेटलिफ्टिंग संघटना हवेली तालुका अध्यक्ष योगेश उबाळे, उपाध्यक्ष अमर गिरी, खजिनदार नरेश गिरी, शिवसेना नेते रमेश भोसले, आप्पासाहेब काळभोर, सुधीर काळभोर या मान्यवरांनी हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## कंटेनरच्या धडकेने विस्कळीत झालेला भोसरीचा वीजपुरवठा पूर्ववत

■ पुणे (दै. संध्या)

भोसरी औद्योगिक वसाहतीत कंटेनरच्या धडकेमुळे विस्कळीत झालेला महावितरणचा वीजपुरवठा युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम करून आज दुपारी ५ वाजता पूर्णपणे पूर्ववत करण्यात आला. महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करून नवीन डबल पोल स्ट्रक्चर उभारले आणि फिडर क्रमांक १२ एफ-२ तसेच १६ जे-२ या दोन्ही फिडरचा वीजपुरवठा सुरळीत केला. रविवारी (दि. ९ ऑगस्ट) सकाळी ११.४० वाजता टाटा मोटर्स शोरूमच्या मागील बाजूस असलेल्या वळण रस्त्यावर १० टन क्षमतेचा कंटेनर (एमएच १२ एचडी ०२९९) भरधाव वेगात येऊन अनियंत्रित झाला. कंटेनरने महावितरणच्या उच्चदाब वाहिनीच्या डबल पोल स्ट्रक्चरला जोरदार धडक दिल्याने पोल वाकला आणि कंटेनर त्यामध्ये अडकला. पोलवरील कंडक्टर एकमेकांना चिकटल्याने वीजपुरवठा खंडित झाला.



## अर्ज नूतनीकरणाची प्रक्रिया सुरू

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नूतनीकरण अर्ज केलेले पात्र विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता अर्ज नूतनीकरण करण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी कळविली आहे. योजनेचा लाभ पुढील शैक्षणिक वर्षात मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह https://hmasnew.mahait.org/ पोर्टलवर नूतनीकरण अर्ज सादर करावेत. विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना सर्व माहिती अचूक भरावी, आवश्यक कागदपत्रे स्पष्ट व पूर्ण स्वरूपात अपलोड करावीत तसेच अर्ज अंतिम करून त्याची खात्री करावी. अपूर्ण अथवा त्रुटीपूर्ण अर्ज सादर करू नयेत.

## आदिवासी समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'आदिम आधार' पतसंस्थेची वाटचाल महत्त्वपूर्ण

### ४ थ्या वर्धापन दिनानिमित्त वार्षिक अहवालाचे वाचन; सभासद, कर्जपुरवठा व आर्थिक व्यवहाराचा आढावा

■ भिवंडी (दै. संध्या)

आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी सहकार क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पतसंस्थांनी पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. बचत, कर्जपुरवठा आणि आर्थिक शिस्तीच्या माध्यमातून नागरिकांना स्वावलंबी करण्याचे कार्य सहकारी पतसंस्थांच्या माध्यमातून प्रभावीपणे होऊ शकते. असे संस्थेचे अहवाल वाचन करताना,संस्थेचे अध्यक्ष महादेव घाटाळ यांनी सांगितले.

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून आदिम आधार आदिवासी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे यांचा ४ था वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल सादर करून संस्थेच्या आर्थिक वाटचालीचा आढावा घेण्यात आला. अहवाल वाचनादरम्यान संस्थेची जमा शिल्लक, वर्षभरातील खर्च, एकूण सभासद संख्या, सभासदांना करण्यात आलेला कर्जपुरवठा, कर्जदार सभासदांची संख्या तसेच संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची स्थिती याबाबतची माहिती उपस्थितांसमोर पतसंस्थेचे अध्यक्ष महादेव घाटाळ यांनी सविस्तरपणे मांडली. यावेळी उपाध्यक्ष सुनील झळकेंसह, संचालक जयराम पाटील, किशोर वाडेकर, सुरेश जाधव, अशोक भेकरे,चंद्रकांत जाधव,प्रमिला भावर व वैष्णवी शेलार इत्यादी उपस्थित होते. सभासदांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे, बचतीची सवय वाढविणे आणि गरजू सभासदांना योग्य वेळी कर्जपुरवठा करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, हा पतसंस्थेच्या कार्याचा महत्त्वाचा भाग असल्याचे यावेळी पतसंस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये संचालकांद्वारे अधोरेखित करण्यात आले. पतसंस्थेची प्रगती केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता सभासदांचा विश्वास, आर्थिक शिस्त, नियमित कर्जवसुली, सुरक्षित ठेवी आणि पारदर्शक कारभार या बाबींवर संस्थेची भविष्यातील वाटचाल अवलंबून असते. सहकाराच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या आर्थिक उन्नतीला हातभार लावण्याचे कार्य संस्थेने सातत्याने पुढे न्यावे, अशी अपेक्षा यावेळी उपस्थित संचालकांच्यावतीने व्यक्त करण्यात आली.पतसंस्थेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त सहकार क्षेत्रातील माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा संदेश या सर्वसाधारण सभेतून देण्यात आला. आदिवासी समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सहकाराची चळवळ अधिक व्यापक करणे, कर्ज वसुली,सभासदांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, हे 'आदिम आधार' पतसंस्थेच्या पुढील वाटचालीतील महत्त्वाचे उद्दिष्ट ठरावे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत व्यवस्थापक सुरज मानकर, वरिष्ठ लिपिक मोनाली घाटाळ, शिपाई अनिल जाधव, विकी जाधव, पद्माकर माळी व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित नोंदवली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जयराम पाटील यांनी केले.



## जागतिक आदिवासी दिनी कर्तृत्वाचा गौरव; गुणवंतांसह समाज भूषणांचा सन्मान

### जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेच्यावतीने सांस्कृतिक कार्यक्रम भव्य रॅलीचे आयोजन

■ भिवंडी (दै. संध्या)

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेच्यावतीने विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन उत्साहात करण्यात आले. यावेळी आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थी, अधिकारी, डॉक्टर, पोलीस अधिकारी तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी महादेव आंबो घाटाळ यांच्यासह आदीम पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुनील झळके, उद्योगपती विजेंद्रकुमार शर्मा, काका पाटील,अनंत केणे, डॉ.अनंता पाटील, प्रभाकर भोईर इत्यादी उपस्थित होते. सुरुवातीस भिनार गाव ते जकात नाक्यापर्यंत भव्य मोठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा, राघोजी भांगरे, तंट्या भिल्ल, नाग्या कातकरी, राणी दुर्गावती, राणी पद्मावती, राणी झलकारी, स्वराज्यरक्षक छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. जागतिक आदिवासी दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात आदिवासी संस्कृती, परंपरा आणि कलांचे दर्शन घडले. यावेळी All India CGL परीक्षेत उत्तीर्ण होऊन आयकर विभागात कार्यालयीन अधीक्षकपदी निवड झालेले कुमार अनुज अनिल कामडी, बारावी उत्तीर्ण जागृती मनेश घाटाल, ग्राम महसूल अधिकारी शीतल एकनाथ सांबरे, कृषी सहायक अधिकारी मेघा पांडुरंग मढवी आणि एमबीबीएस डॉक्टर डॉ. प्रियांका दत्तात्रेय पवार यांचा विशेष गौरव करण्यात आला.

तसेच महाराष्ट्र पोलीस दलात उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले अशोक गणू वाघचौरे, गोपाळ सखाराम शिंदे, बाळाराम महादू तांबडे, गजानन हरी राऊत आणि पांडुरंग वामन मढवी यांना 'आदिवासी समाजभूषण' सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल सुभाष झळके आणि ट्रायबल फोरमचे कोकण विभागीय कार्याध्यक्ष व वृत्तपत्र लेखक सुनील झळके यांना त्यांच्या सामाजिक,पत्रकारिता, लेखनासंदर्भात केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल 'आदिवासी समाजभूषण' सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच शासकीय आश्रमशाळा, भिनार हिला 'सर्वोत्कृष्ट आश्रमशाळा' म्हणून सन्मानपत्र देण्यात आले. कार्यक्रमास जयराम पाटील, अनिल भेकरे, भरत घाटाळ (सरपंच, भिनार) सुनील डवला, भानुदास वाघ, दशरथ शेलार,अशोक काचरे, अरुण गायकर, बळीराम केशव, सुरज मानकर, सुरेश जाधव, मोनाली घाटाळ, विकी जाधव, अनिल जाधव,जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेचे विविध क्षेत्रातील मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी आदिवासी समाजातील गुणवंतांचा गौरव करून नव्या पिढीला शिक्षण, कर्तृत्व आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा देण्याचा हा उपक्रम असल्याचे मनोगत अध्यक्ष महादेव घाटाळ यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिवंडीतील प्रसिद्ध राजेंद्र पाटील यांनी आपल्या ओघवत्या शैलीमध्ये केले.

